




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. ०४ मार्च २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# अवैध धंद्यांवरील कारवाईसाठी अहिल्यानगरमध्ये 'हेल्पलाईन क्रमांक'

**राहाता (समर्थ गांवकरी)**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैध धंदे व गुन्हेगारी प्रवृत्तींना मिळणारा आश्रय मोडून काढण्याची आवश्यकता असून, यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने काम करणे अपेक्षित आहे. नागरिकांमधील भीती दूर करून त्यांना थेट प्रशासनाशी जोडण्यासाठी लवकरच एक विशेष 'हेल्पलाईन क्रमांक' कार्यान्वित करण्यात येईल. याद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारींमध्ये नागरिकांची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवून प्रशासनामार्फत योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.




कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याची नूतन इमारत व पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या ६४ निवासस्थानांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. पोलीस दलासाठी अत्याधुनिक चार फॉरेन्सिक लॅब व्हॅनचे लोकार्पणही करण्यात आले. आमदार आशुतोष काळे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, नगराध्यक्ष पराग संधान, गोदावरी दूध संघाचे संचालक राजेश परजणे आदी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील म्हणाले, राज्य शासनाच्या धोरणानुसार पोलिसांच्या कल्याणासाठी गृहनिर्माण प्रकल्पांना गती देण्यात आली असून, अहिल्यानगर शहरातील जिल्हा मुख्यालयात ३२२ निवासस्थानांचे काम सुरू आहे तसेच कोपरगाव (४८) व पाथर्डी (५४) येथील निवासस्थानांचे काम पूर्ण झाले असून, राहाता व शिर्डी येथे अद्ययावत पोलीस ठाण्यांच्या इमारती उभारण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय व समृद्धी महामार्गांमुळे वाढणारी अंमली पदार्थांची तस्करी व गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस दलाचे मनुष्यबळ वाढवणे अत्यावश्यक आहे. याकरिता ५०० अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची मागणी शासनाकडे नोंदवण्यात आली आहे. गुन्हेगारी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून संपूर्ण जिल्ह्यात सीसीटीव्ही यंत्रणेचे जाळे विस्तारण्यावर भर देण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन मंडळामार्फत सर्व महाविद्यालयांच्या परिसरात सीसीटीव्ही बसवण्याचे नियोजन करण्यात आले असून, ग्रामपंचायतींनीही लोकसहभागातून आपापल्या गावांमध्ये सीसीटीव्ही बसवून २४ तास लक्ष ठेवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, गुन्ह्यांचा तपास वेगाने व्हावा आणि न्यायदानात विलंब होऊ नये, यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर अत्याधुनिक 'फॉरेन्सिक व्हॅन' उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याद्वारे घटनास्थळी जलद तपासणी करणे शक्य होऊन तपासाला गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आमदार आशुतोष काळे म्हणाले की, कोपरगावमधील अवैध धंदे व गावठी दारूविक्रीवर कठोर करावी, समाजात चुकीची माहिती पसरवून दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी. यावेळी माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचेही भाषण झाले. प्रातिनिधीक स्वरुपात पाच पोलीस अधिकारी – कर्मचाऱ्यांना गृहसंकुलाच्या चाव्या हस्तांतरित करण्यात आल्या. प्रास्ताविक पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले, आभार पोलीस निरीक्षक संदीप काळे यांनी मानले.

## थोडक्यात...

### आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थिती

**सावंतवाडी(समर्थ गांवकरी) :** आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. तेथे अडकलेल्या जिल्ह्यातील नागरिकांची माहिती तातडीने संकलित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती तृप्ती धोडमिसे यांनी दिले आहेत. त्यानुसार आतापर्यंत जिल्ह्यातील 102 नागरिकांची माहिती प्रशासनाने संकलित केली असून ती राज्य शासनाकडे सादर करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या 102 नावांपैकी 11 नागरिकांना तातडीच्या मदतीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. या 11 जणांच्या नावांची स्वतंत्र यादी तयार करून ती पुढील कार्यवाहीसाठी राज्य शासनाकडे पाठवण्यात आली आहे. महसूल आणि पोलीस विभागामार्फत तालुका व जिल्हा स्तरावर ही माहिती गोळा करण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

### एक खिडकी उपक्रम

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** अपंग व्यक्तींना शासकीय योजना, सेवासुविधांचा सुलभ व पारदर्शक पद्धतीने लाभ मिळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने 'एक खिडकी' योजना सुरु केली आहे. या उपक्रमामुळे अपंग नागरिकांना केवळ जिल्हा परिषदच नव्हे तर इतरही शासकीय कार्यालयातून हेलपाटे न मारता एकाच ठिकाणी आवश्यक सर्व सेवा डिजिटल माध्यमातून उपलब्ध होणार असल्याची माहिती जिल्हा अपंग सक्षमीकरण अधिकारी देवीदास कोकाटे यांनी दिली.

# प्रतिबंधित ४ हजार किलो मांगुर मासे जप्त करून केले नष्ट

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आरोग्यास अपायकारक असल्याने केंद्र सरकारने प्रतिबंधित केलेल्या मांगुर माशांची वाहतूक होत असलेल्या साठ्यावर पोलिसांनी पुन्हा एकदा कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये ४ हजार किलो मांगुर मासे जप्त करण्याची कारवाई पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. जप्त केलेले मांगुर मासे पश्चिम बंगालमधून मुंबईला पाठवले जाणार होते, असे तपासात निष्पन्न झाल्याची व चौघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दिली. बंदी घातलेल्या मांगुर माश्यांच्या वाहतुकीवर, साठ्यांवर यापूर्वीही पोलिसांनी कारवाई केली आहे. मात्र त्यास प्रतिबंध बसलेला नाही. अहिल्यानगर-मनमाड रस्त्याने पश्चिम बंगालमधून मांगुर मासे घेऊन निघालेली मालवाहतूक




मोटार (डब्ल्यूबी २५ एम ५०२३यु) मुंबईकडे जात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकास मिळाली. या पथकाने शिर्डी पोलीस ठाण्याचे निरीक्षक रणजीत गलांडे, उपनिरीक्षक सागर काळे यांच्या समवेत निमगाव बाह्यवळण रस्त्यावर सापळा रचून संशयित मालमत्ता ताब्यात घेतली.तपासणीमध्ये मालमोटारीच्या केबिनमध्ये ४ हजार किलो मांगुर माशांचा साठा आढळला. यासंदर्भात स्वपन नियम डे (३६), मकबूल रौफ सरदार (३१), कुतुब आयुब मंडल (३५) व मृत्युंजय मुकुंद विश्वास (२७, सर्व पश्चिम बंगाल) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यानंतर पथकाने पोलिसांनी ठाणे येथील मत्स्य विकास अधिकारी प्रतीक्षा सुधाकर पाटेकर यांच्याशी संपर्क करून ताब्यात घेतलेल्या माशांची तपासणी केली व ते प्रतिबंधित मांगूरर मासे असल्याचा अभिप्राय पाटेकर यांनी दिला.जप्त करण्यात आलेल्या ४ हजार किलो प्रतिबंधित माशांची किंमत ४ लाख रुपये आहे. याबरोबरच २५ लाख रुपये किमतीची मालमोटर असा एकूण २९ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त केलेले प्रतिबंधित मासे कायदेशीर प्रक्रिया करून त्यांचा नाश करण्यात आला. या संदर्भात मत्स्यविकास अधिकारी प्रतीक्षा पाटेकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक दीपक मेढे, अंमलदार राहुल द्वारके, शाहिद शेख, फुरकान शेख, राहुल डोके, सुनील मालणकर, प्रशांत राठोड, सतीश भवर, उमाकांत गावडे, उत्तरेश्वर मोराळे यांच्या पथकाने या कारवाईमध्ये भाग घेतला. पोलिसांनी प्रतिबंधित मांगुर माशांच्या साठ्यांवर यापूर्वीही कारवाई केली आहे.

# कला शिक्षण सीईटीच्या प्रवेश नोंदणीस मुदतवाढ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सीईटी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली असून, अनेक अभ्यासक्रमांच्या नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार एएसी कला शिक्षणाअंतर्गत असलेल्या रेखा व रंगकला, शिल्पकला, वस्त्रकला, मातकाम, अंतर्गत गृहसजावट, धातूकला, उपयोजित कला या अभ्यासक्रमांच्या सीईटीच्या प्रवेश नोंदणीस मुदतवाढ देण्याचा निर्णय सीईटी कक्षाने घेतला आहे. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना १३ मार्चपर्यंत नोंदणी करता येणार आहे. एएसी – कला शिक्षण सीईटी या प्रवेश परीक्षेमध्ये २ हजार ४०५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून या अभ्यासक्रमासाठी अर्ज नोंदणी करण्यासाठी ४ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली हाती. मात्र मागील वर्षीच्या तुलनेत यंदा कमी नोंदणी झाली असून तसेच प्रवेश परीक्षा १० एप्रिल रोजी आहे. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला नोंदणी करता यावी यासाठी सीईटी कक्षाने एएसी कला शिक्षण या अभ्यासक्रमाच्या सीईटीसाठी अर्ज नोंदणी करण्याकरिता १३ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. २०२५ च्या कला शिक्षणाच्या सीईटीमध्ये २ हजार ७८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या http://www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

# शिक्षण विभागाचा मोठा निर्णय, राज्यातील ४ हजार ३२५ शाळांची तपासणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शाळांमध्ये पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेचे (शालेय पोषण आहार) सामाजिक लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. या अंतर्गत राज्यातील पाच टक्के म्हणजे ४ हजार ३२५ शाळांतील या योजनेचे परीक्षण करण्यात येणार असून, त्यात प्रत्येक जिल्ह्यातील पाच टक्के शाळांचा समावेश असेल. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शाळांतील पटनोंदणी आणि उपस्थितीमध्ये वाढ करण्यासाठी राज्यात १५ ऑगस्ट १९९५पासून शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये पहिली ते आठवीच्या ८९ लाख विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला.

**■ अनियमितता आढळल्यास कारवाई**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार योजनेत पारदर्शकता आणणे, समाजाचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेमार्फत सामाजिक लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. त्यानुसार, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण आणि पारदर्शकता सोसायटी यांच्यामार्फत योजनेचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यास मान्यता देण्यात आल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. या कामासाठी २ कोटी ४२ लाख ९३ हजार ५२५ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. लेखापरीक्षणाच्या प्रक्रियेत पालक, अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा यांच्याबरोबर शाळास्तरीय बैठका आयोजित केल्या जाणार आहेत.

# जिल्हा परिषदेतील सत्तेत सहभागासाठी शिंदेची शिवसेना आग्रही

**अलिबाग : (समर्थ गांवकरी)**

रायगड जिल्हा परिषदेतील सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या शिंदेच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक नेते प्रयत्नशील आहेत. मात्र जिल्हा परिषदेत शिवसेनेलाही सत्तेत वाटा मिळावा यासाठी शिंदे गटाचे आमदार आग्रही आहेत. यासाठी भाजपच्या वरीष्ठ नेत्यांशी बैठकांचे सत्र सुरू असल्याची खात्रीलायक वृत्त आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदासाठी येत्या १२ मार्चला विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे सत्तास्थापनेच्या हालचालींनी वेग घेतला आहे. शिंदेच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी स्थानिक भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आग्रही असले तरी, शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांकडून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांवर युतीसाठी आग्रह धरून दबाव टाकला जात आहे. भरत गोगवले यांच्या




नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन यात हस्तक्षेप करण्याची विनंती केली. नंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या समवेत शिवसेनेच्या नेत्यांची बैठक झाली. विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्या दालनातही शिवसेना आणि भाजप नेत्यांची जिल्हा परिषदेतील सत्ता स्थापनेसाठी चर्चा झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. महायुतीमधील तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करावी यासाठी प्रयत्न करण्यात आले. तिनही पक्षांना दीड वर्ष जिल्हा परिषद अध्यक्षपदाची संधी देण्याबाबत पर्याय यावेळी समोर ठेवण्यात आला.

भाजप आणि राष्ट्रवादीकडून या वृत्ताला दूजोरा देण्यात आला नसला तरी शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी चर्चा सूरू असल्याचे स्पष्ट केले आहे. रोजगार हमी आणि फलोत्पादन भरत गोगावले यांनी जिल्हा परिषदेत सत्तेत तिन्ही पक्ष एकत्र यावेत यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे. जिल्हा परिषदेच्या सत्तेत आम्ही सहभागी होऊ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तर जिल्हा परिषदेत महायुती होईल आणि शिवसेनेचाच अध्यक्ष बसेल असा आशावाद आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे सत्तासहभाग निश्चित करण्यासाठी शिवसेना नेत्यांकडून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिर्षस्थ नेत्यांची मनधरणी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# व्यक्तीची २२.२१ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**रत्नागिरी : (समर्थ गांवकरी)**

परदेशातील मैत्री, आर्थिक मदतीचे आश्वासन आणि परताव्याच्या आमिषाने रत्नागिरीतील एका व्यक्तीची तब्बल २२ लाख २१ हजार ४०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात युनायटेड किंगडममधील टिआगो फौरा तसेच स्वतःला दिल्लीतील पासपोर्ट-इमिग्रेशन अधिकारी म्हणून भासवणाऱ्या प्रिया शर्मा हिच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उद्यमनगर परिसरातील पडवेकर कॉलनी येथे राहणारे सलील अब्दुल कादीर काझी यांची एका ऑनलाईन संकेतस्थळाच्या माध्यमातून टिआगो




फौरा याच्याशी ओळख झाली. २२ जुलै २०२५ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत आरोपीने विश्वास संपादन करत आर्थिक व्यवहारांची मालिका सुरू केली. दरम्यान, स्वतःकडे ६० हजार यूके पाउंड आणि सोने असल्याने दिल्ली इमिग्रेशन विभागाने ताब्यात घेतल्याचा बनाव करण्यात आला. ही रक्कम भारतीय चलनात रूपांतरित करण्यासाठी तसेच कथित अडचणीतून सुटका करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर 'प्रिया शर्मा' नावाच्या महिलेने दिल्ली येथील पासपोर्ट-इमिग्रेशन कार्यालयातील अधिकारी असल्याचे भासवत फिर्यादीशी संपर्क साधला.

रक्कम लवकरच परत करण्याचे आश्वासन दिल्याने फिर्यादी काझी यांनी आपल्या आयसीआयसीआय आणि एचएसबीसी बँक खात्यांतून वेळोवेळी विविध व्यवहारांद्वारे एकूण २२ लाख २१ हजार ४०० रुपये पाठवले. मात्र, ठरल्याप्रमाणे रक्कम परत न आल्याने आणि आरोपींकडून संपर्कही तुटल्याने फसवणुकीचा प्रकार उघड झाला. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम ३१८ (४), ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६ (५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे देशातील पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढणार, या चर्चेने नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. मात्र, सध्या तरी देशातील पेट्रोल-डिझेलच्या किमतीवर या संघर्षाचा परिणाम होणार नाही. काही काळ वाट पाहावी लागेल,' अशी भूमिका तेल तज्ज्ञांनी बोलताना मांडली. 'देशातील तेल कंपन्यांकडे अजून काही महिने पुरेल इतका तेलसाठा आहे. त्यामुळे नागरिकांनी पेट्रोल पंपांसमोर रांगा लावू नयेत,' असे आवाहन 'ऑल इंडिया पेट्रोल असोसिएशन' कडून करण्यात आले आहे. 'इराण-इस्रायलमध्ये पेटलेल्या युद्धामुळे पश्चिम आशियात तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. इराण, इराक, सौदी




अरेबिया, अबुधाबी, कुवेत, कतार या देशांमधून मोठ्या प्रमाणात तेलाची निर्यात केली जाते. हे देश तेलाचे दर ठरवणाऱ्या तेल उत्पादक संघटनेचे, 'ओपेक' चे सदस्य आहेत. आखातात निर्माण झालेल्या तणावाचा परिणाम जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या किमतींवर पर्यायाने देशातील तेलाच्या पुरवठ्यावर होतो. सोमवारी, एका दिवसात आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती सुमारे सात टक्क्यांनी वाढल्या. भारतावर होणारे परिणाम लगेच सांगता येणार नाहीत. त्यासाठी काही काळ वाट पहावी लागेल,' अशी भूमिका देशातील प्रख्यात तेलतज्ज्ञ श्रीकृष्ण देशपांडे यांनी मांडली. 'देशात सुमारे ८८ टक्के कच्चे तेल आणि सुमारे ५० टक्के नैसर्गिक वायूसाठी आपण आयातीवर अवलंबून आहोत. गेल्या काही वर्षांत भारताने या आयातीसाठी वेगवेगळे पर्याय निवडले आहेत. पश्चिम आशियाबरोबरच रशिया, अमेरिका आणि आफ्रिका इत्यादी देशांकडून आपल्याला तेलाचा पुरवठा होतो. त्यामुळे एका प्रदेशातील तणावामुळे लगेच पुरवठा संकट निर्माण होईल, असे सध्या तरी दिसत नाही,' असे निरिक्षण 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड' चे माजी अध्यक्ष श्रीकांत वैद्य यांनी नोंदवले.

# घारगावमध्ये सहकाराची दमदार सुरुवात

## यशोमंदिर पतपेढीच्या नव्या शाखेत पहिल्याच दिवशी ३०० सभासद नोंद, कोट्यवधींच्या ठेवी जमा!










**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील पठार भागातील घारगाव येथे सहकार क्षेत्रात नवा अध्याय सुरू करत यशोमंदिर सहकारी पतपेढी मर्यादित यांच्या तेविसाव्या शाखेचा उद्घाटन सोहळा मंगळवार, दि. ३ मार्च रोजी मोठ्या उत्साहात व थाटामाटात संपन्न झाला. पहिल्याच दिवशी तब्बल ३०० सभासदांची नोंद करण्यात आली असून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी शाखेत जमा झाल्याने संस्थेच्या कार्याला जोरदार प्रारंभ मिळाला आहे.

घारगाव शाखेचे उद्घाटन माजी आमदार डॉ. सुधीरजी तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांताराम वाकळे होते. प्रमुख उपस्थितीत मनसेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गणपतराव महाले, माजी जिल्हा परिषद सदस्य अजय फटांगरे, जनार्दन आहेर, मनसे जिल्हाध्यक्ष किशोर डोके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी यशोमंदिर पतसंस्थेचे संस्थापक मधुकर दादा गायकर, अध्यक्ष भानुदास आरोटे, उपाध्यक्ष अमोल उगले, सरव्यवस्थापक भाऊसाहेब गवांदे तसेच संस्थेचे संचालक मंडळ, कर्मचारीवृंद, पठार भागातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घारगाव हे संगमनेर तालुक्यातील पठार भागातील महत्त्वाचे गाव मानले जाते. या भागात शेती, लघुउद्योग व किरकोळ व्यवसाय करणाऱ्या नागरिकांना विश्वासार्ह आर्थिक संस्थेची गरज होती. ती गरज ओळखून यशोमंदिर पतपेढीने येथे शाखा सुरू केली आहे. बचत खाते, मुदत ठेव, विविध कर्जसुविधा, व्यापारी व शेती कर्ज अशा सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याने स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. उद्घाटनाच्या दिवशीच ३०० सभासदांची नोंदणी होणे आणि कोट्यवधी रुपयांच्या ठेवी जमा होणे हे संस्थेवरील विश्वासाचे प्रतीक मानले जात आहे. ग्रामीण भागात इतक्या मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा होणे ही उल्लेखनीय बाब असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

### नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

कार्यक्रमस्थळी महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. स्थानिक व्यापारी, शेतकरी, युवक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाखेला पाठिंबा दर्शविला. उद्घाटनानंतर अनेक नागरिकांनी तत्काळ खाते उघडून ठेवी जमा केल्या. घारगाव शाखेच्या माध्यमातून पठार भागातील आर्थिक व्यवहारांना गती मिळणार असून, स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पहिल्याच दिवशी मिळालेला प्रतिसाद पाहता ही शाखा भविष्यात परिसराच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "सहकारातून समृद्धीकडे" या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन संस्था कार्यरत आहे. पारदर्शक व्यवहार, विश्वासार्ह सेवा आणि सभासदकेंद्री धोरणे यामुळेच शाखा विस्तार वेगाने होत आहे. १९७९ साली स्थापन झालेली ही संस्था आज राज्यातील विविध भागांत शाखा विस्तार करत आहे. घारगाव येथील ही तेविसावी शाखा असून, ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# अकोले येथे ग्रामीण रुग्णालयाचे कान-नाक-घसा विशेष शस्त्रक्रिया शिबिर

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अकोले व ग्रामीण रुग्णालय अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ फेब्रुवारी २०२० रोजी ग्रामीण रुग्णालय, अकोले येथे कान-नाक-घसा आजारांसाठी विशेष शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास तालुक्यातील विविध भागांतील शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कॅम्पसाठी सिव्हिल हॉस्पिटल अहिल्यानगर येथून कान-नाक-घसा तज्ञ डॉ. महावीर कटारिया व त्यांची तज्ज्ञ टीम अकोले येथे दाखल झाली होती. दिवसभरात सुमारे ९० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २४ मुलांवर तातडीने 'टंग टाय' (जिभेच्या शिरेचा अडथळा) शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली. शस्त्रक्रिया सुरळीत पार पडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. वेळेवर निदान व उपचार झाल्याने मुलांच्या बोलण्यातील व खाण्यापिण्यातील अडचणी दूर होण्यास मदत होणार असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. या शिबिरासाठी पंचायत समिती अकोलेच्या शिक्षण विभागाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन ग्रामीण रुग्णालय अकोलेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब मेहेत्रे यांनी केले. तसेच डॉ. लोहारे, डॉ. संदीप कडलग, डॉ. अजय शिंदे, डॉ. निर्मला येणारे, डॉ. पूनम कोटकर, डॉ. मंजुश्री राहणे, डॉ. नमिता सहाने, डॉ. संतोष कानवडे, डॉ. दशरथ धांडे यांच्यासह पापळ सोनाली, विक्रम नाईकवाडी, शिंदे सिस्टर, अधिपरिचारक हिवाळे व ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# धनलक्ष्मी महिला मंडळाचा वर्धापन उत्साहात संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

श्री. धनलक्ष्मी महिला मंडळ आयोजित अंतरशालेय विद्यार्थी सामूहिक नृत्य स्पर्धा, सर्वोत्कृष्ट पती - पत्नी पुरस्कार २०२६ सोहळा विष्णूदास भावे नाट्यगृह वाशी येथे आयोजित करण्यात आला यावेळी नवी मुंबई अंतरशालेय नृत्य स्पर्धेत २७ शाळांनी स्पर्धेत सहभागी होऊन गोंधळ, कोळी नृत्य, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज नाट्य रूपांतर शौर्य गीतावर सादरीकरण करून सोहळ्यात रंग भरले. या सोहळ्यास विशाल चॅरिटेबल अँड एज्यूकेशनल ट्रस्ट, ब्रिलीयंट कॅम्पुटर वाशी, चेतक स्वीट कॉर्नर, आर. के. ग्रुप यांच्या सहकार्याने या सोहळ्याचा आनंद द्विगुणित झाला.

# नवलेवाडी परिसरात गायींच्या रहस्यमय आजाराने थैमान, अनेक गायांचा मृत्यू

## शेतकरी हवालदिल, तातडीच्या मदतीची मागणी!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील नवलेवाडी परिसरात गायींच्या मृत्यूचे सत्र सुरू असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. नवलेवाडी येथील शेतकरी संदीप बाळासाहेब खांडगे यांच्या गोठ्यात गेल्या महिनाभरात पाच गायींचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे या गायींना नेमका कोणता आजार झाला आहे, याचे स्पष्ट निदान अद्यापही झालेले नाही.

पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनेक वेळा तपासणी व उपचार केले, मात्र आजाराचे ठोस कारण समोर आले नाही. त्यामुळे संबंधित शेतकरी मोठ्या मानसिक तणावाखाली असून लाखो रुपयांचे नुकसान त्यांच्या डोळ्यासमोर होत आहे. दरम्यान, नगर जिल्ह्यातील देवठाण येथेही अशाच प्रकारे गायींचा मृत्यू होत असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे हा संसर्गजन्य आजार तर नाही ना? अशी भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. नवलेवाडी परिसरात या अज्ञात आजाराने थैमान घातल्याने पशुपालकांमध्ये घबराट पसरली आहे. या घटनेची गंभीर दखल घेत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी करत आहेत. जिल्हाधिकारी, नगर यांनी तातडीने घटनास्थळी पाहणी करून योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी लवकरच घटनास्थळी भेट देऊन चौकशी करणार असल्याचे सांगितले. तसेच संबंधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी पशुसंवर्धन मंत्र्यांशी चर्चा करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



या घटनेत नुकसानग्रस्त शेतकरी म्हणून संदीप बाळासाहेब खांडगे, दामोदर गणपत आरोटे, शिवाजी बाबुराव नवले, विनायक गंगाधर चौधरी, ज्ञानेश्वर पांडुरंग नवले आणि संजय भिकाजी नवले यांचा समावेश आहे. सदर प्रकरणी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न



**राजूर (समर्थ गांवकरी)**

राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे अॅड. एम.एन.देशमुख कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ शनिवार, दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष अॅड. मनोहररावजी देशमुख हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व विनोदी कथाकार डॉ.संजय कळमकर व आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक विजेती सॉफ्टबॉल खेळाडू कु.फिजा सय्यद यांच्या हस्ते शैक्षणीक वर्ष २०२५- २६ मध्ये शैक्षणिक, कला आणि क्रीडा क्षेत्रात प्राविण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री मा.अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व कार्यक्रमाची सुरुवात'जय जय महाराष्ट्र माझा'या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ संजय कळमकर म्हणाले की,"शिक्षण केवळ पदवी मिळवण्यासाठी नसून ते जगण्याची समृद्ध कला शिकवण्यासाठी आहे. अपयशाने खचून न जाता विद्यार्थ्यांनी आपल्यातील उपजत गुणांचा विकास करावा."असे विचार मांडले. आपल्या मनोगतपर भाषणात राष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू कु. फिजा सय्यद म्हणाल्या की," ग्रामीण भागातील खेळाडूंनी मोठी स्वप्ने पाहावीत व कष्ट करण्याची तयारी ठेवावी " महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. बी.वाय.देशमुख यांनी मान्यवरांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या शैक्षणिक आलेखाचा आढावा मांडला. तर प्रमुख अतिथींचा परिचय प्रा.डॉ. द.के.गंधारे यांनी करून दिला. वरिष्ठ महाविद्यालय वार्षिक अहवालाचे वाचन प्रा. डॉ.आर.डी.ननावरे यांनी तर कनिष्ठ महाविद्यालय वार्षिक अहवालाचे वाचन प्रा. मोनिका देव यांनी केले. शैक्षणिक व विशेष पारितोषिके यांचे वाचन प्रा. डॉ.पी. टी.करंडे तर अभ्यासेत्तर व कला मंडळ विभागाचे वाचन प्रा.आर. सी.मुठे आणि प्रा.बी.के. थोरात यांनी केले. क्रीडा विभागातील विजेत्या विद्यार्थ्यांचे वाचन प्रा.व्ही. बी.नवले यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अॅड.मनोहरराव देशमुख साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.पी.टी.करंडे व प्रा. योगिता वाकचौरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.बी.टी.शेणकर यांनी केले.या सोहळ्यासाठी संस्थेचे सर्व संचालक, पालक, प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्थसंकल्पाबाबत ठाम भूमिका

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



अग्रवाल मारवाडी वाणिज्य, उद्योग व शिक्षण मंडळाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आगामी अर्थसंकल्पाबाबत ठोस, परिणामकारक व वेळबद्ध सुधारणांची जोरदार मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र हा देशाचा आर्थिक व औद्योगिक कणा असल्यामुळे केवळ घोषणांवर न थांबता ठोस धोरणात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, "महाराष्ट्राला टप्प्याटप्प्याने नव्हे तर वेगवान आर्थिक गतीची गरज आहे. उद्योग व गुंतवणूकदारांना ठोस निर्णयांची अपेक्षा आहे."

# अतिक्रमणाचा प्रश्न गाजला अधिवेशनात

**वाशिम : (समर्थ गांवकरी)**

ग्रामपंचायत अरक येथील जिल्हा परिषद शाळेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असला तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रश्न निर्माण झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ विदर्भ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८/०२/२०२६ रोजी वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा व पदाधिकारी सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रतापराव जाधव तसेच राहुल मोतीराम तुपसांडे (सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती, नगरपरिषद वाशिम) उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत अरक



येथील जिल्हा परिषद शाळेवरील अतिक्रमणाच्या गंभीर प्रश्नासंदर्भात दोन्ही मान्यवरांना सविस्तर निवेदन देण्यात आले. सदर विषयाची गांभीर्याने दखल घेत त्यांनी येत्या काही दिवसांत संबंधित प्रशासनाशी चर्चा करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे ठोस आश्वासन दिले. ग्रामस्थ व पालकवर्ग आता प्रशासनाच्या पुढील पावलाकडे लक्ष ठेवून असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी तातडीने कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# छत्रपती संभाजीनगर मध्ये तरुण-तरुणी बेपत्ता

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

तिजगाव (ता. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवासी राजू उर्फ राज गणेश चव्हाण (वय अंदाजे २१-२२ वर्षे) हा तरुण सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी घरातून बाहेर पडून बेपत्ता झाला आहे. घरच्यांना त्याने एका मुलीसोबत लग्न करण्यासाठी बाहेरगावी जात असल्याचे सांगितल्याची माहिती मिळाली आहे. तो स्थानिक हॉटेलमध्ये काम करत होता. याप्रकरणी वाळूज पोलीस स्टेशन येथे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, मिटमिटा गिरजा नगर परिसरातील वैशाली (नाव बदललेले) ही तरुणीही त्याच दिवशी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास घरून कोणालाही न सांगता निघून गेल्याची नोंद आहे. तिचे शिक्षण बारावीपर्यंत झाले असून रंग गोरा, चेहरा गोल, उंची अंदाजे पाच फूट दोन इंच आहे. अंगात मेंदी रंगाचा टी-शर्ट, गुलाबी पॅन्ट व पायात काळ्या रंगाच्या सँडल होत्या. ती मराठी व हिंदी भाषा बोलते. तिच्या बेपत्ता होण्याची तक्रार कॅन्टोन्मेंट छावणी पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १७३ (२) प्रमाणे नोंदविण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक विवेक गणपत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गीता हाके या पुढील तपास करीत असून पोलिसांनी फोन कॉल तपशीलांचीही पडताळणी सुरू केली आहे.



# आगामी चित्रपट महोत्सव हंगामासाठी समीक्षकांनी "From Slaves to Bond" ला अग्रगण्य दावेदार ठरवले

**(समर्थ गांवकरी)**

The Youth Auteur आणि नवी दिल्लीतील नामांकित चित्रपट संस्थांशी संलग्न समीक्षकांनी, ज्यात Habitat Film Club चा समावेश आहे, "From Slaves to Bond" या माहितीपटाला आगामी आंतरराष्ट्रीय पुरस्कारांसाठी संभाव्य आघाडीचा दावेदार म्हणून घोषित केले आहे. विशेषतः International Film Festival of India (IFFI) वर लक्ष केंद्रीत केले आहे. पत्रकार Alexey Pivovarov यांनी तयार केलेला आणि 2025 मध्ये प्रदर्शित झालेला हा व्यापक माहितीपट सध्या महोत्सवी प्रीमियरसाठी सज्ज केला जात आहे.

चित्रपट क्षेत्रातील निरीक्षकांचे मत आहे की हा चित्रपट ब्रिटिश साम्राज्याच्या वारशाचे निर्भीड परीक्षण सादर करतो. निर्मिती प्रक्रियेत लंडन, मुंबई, कोलकाता, आफ्रिका आणि ग्रीस येथे विस्तृत चित्रीकरण करण्यात आले. मुलाखतींमध्ये ब्रिटिश इतिहासकार, गुलामांच्या वंशज, भारतीय उद्योगपती आणि ग्रीक पुरातत्त्वज्ञ यांचा समावेश आहे. या माहितीपटात ब्रिटिश संग्रहालयांच्या साठवण कक्षांतील दुर्मीळ दृश्यफिती तसेच माजी वसाहतींतील समकालीन स्थळांचे चित्रण समाविष्ट आहे.




भारतीय प्रेक्षकांसाठी हा चित्रपट अनेक संवेदनशील मुद्द्यांना स्पर्श करतो. ब्रिटिशांच्या निर्गमनानंतर भारत स्वतःच्या लोकसंख्येला अन्न पुरवण्यातही असमर्थ होता. "सभ्यतेचे ध्येय" या नावाखालील शोषणाने १९व्या आणि २०व्या शतकातील काही भीषण मानवी संकटांना जन्म दिला, याचे हे प्रभावी प्रतीक मानले जाते.

लंडनमधील अलीकडील संग्रहालय कर्मचाऱ्यांच्या चोरीच्या घटनांनंतर कलावस्तूंच्या सुरक्षेबाबत हा माहितीपट गंभीर प्रश्न उपस्थित करतो. Parthenon Marbles आणि Benin Bronzes यांच्या प्रकरणांतून परताव्याच्या (restitution) मागण्यांचा अभ्यास करताना भारताच्या Koh-i-Noor, Amaravati Marbles आणि Tipu Sultan यांच्या वस्तूंवरील दाव्यांशी तीक्ष्ण तुलना केली आहे.

चित्रपटात राजवटीचा (Raj) कठोर आर्थिक विश्लेषण सादर केले आहे, ज्यात "रेल्वे ही भेट" या पारंपरिक कथनापलीकडे जाऊन विचार केला आहे.

पायाभूत सुविधा प्रकल्प सार्वजनिक सेवेसाठी नव्हे तर संसाधन उपसा आणि लष्करी तैनातीसाठी रचले गेले होते, हे तो दाखवतो. भारताच्या वस्त्रोद्योगाच्या प्रणालीबद्ध ऱ्हासाचे आणि "colonial drain" सिद्धांताच्या यंत्रणांचे विश्लेषण करण्यात आले आहे. Pivovarov यांच्या तपासात संग्रहित दस्तऐवज, नकाशे आणि सांख्यिकीय आकडेवारीचा वापर करण्यात आला असून वसाहतकालीन काळात जागतिक अर्थव्यवस्थेतील भारताचा वाटा सुमारे २४% वरून ४% पेक्षा कमी कसा झाला यावर विशेष भर देण्यात आला आहे.

International Film Festival of India (IFFI) चा 57वा आवृत्ती नोव्हेंबर 2026 मध्ये गोवा येथे आयोजित केला जाणार आहे. हा महोत्सव आंतरराष्ट्रीय चित्रपट निर्मात्यांच्या उत्कृष्ट कलाकृती दक्षिण आशियाई प्रेक्षकांसमोर सादर करण्यासाठी प्रसिद्ध आहे.

# मातोश्री सोनाबाई हांडे यांचा अभिष्टचिंतन व वास्तुशांती सोहळा उत्साहात संपन्न!

- “आई म्हणजेच पांडुरंगाचे रूप; मातोश्रींना शतायुष्य लाभो” – डॉ. किरण लहामटे
- “या गावाने मला घडवले; मातोश्रींचा सन्मान म्हणजे आयुष्यातील मोठा अभिमान” – सिताराम पाटील गायकर
- “आई हिमालयाएवढी उंच, सागराएवढी खोल; जिवंतपणी सन्मान हेच खरे पुण्य” – शंकरजी गायकर







**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे हांडे परिवाराच्या वतीने आयोजित मातोश्री सोनाबाई बबनराव हांडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यासह नव्या वास्तूच्या वास्तुशांती कार्यक्रमाचा भव्य समारोप रविवारी दि. १ मार्च २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात झाला. यावेळी जेष्ठ पारिवारिक व सामाजिक मान्यवरांचा सन्मान समारंभही पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पाटील गायकर तसेच विश्व हिंदू परिषदचे सहमंत्री शंकरजी गायकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमात जेष्ठ पारिवारिक व सामाजिक मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी हांडे परिवाराच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत मातोश्री सोनाबाई हांडे यांना अभिष्टचिंतनपर शुभेच्छा दिल्या व त्यांच्या दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी ह.भ.प. दिपक महाराज देशमुख यांचे सुश्राव्य संगीतमय प्रवचन झाले. त्यांनी कुटुंब एकतेचे महत्त्व, संस्कारांची जपणूक आणि आध्यात्मिक जीवनमूल्ये प्रभावीपणे मांडली. उपस्थितांनी प्रवचनाचा मनोभावे लाभ घेतला.

आपल्या मनोगतात डॉ. किरण लहामटे म्हणाले की, “अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने सर्व क्षेत्रांतील मान्यवर येथे उपस्थित आहेत, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. आई आज भारावून गेली आहे. लेकरांबद्दलचे तिचे प्रेम हेच तिचे खरे वैभव आहे.” ते पुढे म्हणाले, “परमेश्वराने प्रत्येकाला वेगवेगळी कामे दिली आहेत. मला पुढील कार्यक्रमासाठी जावे लागणार असले तरी आईचा सन्मान हा सर्वात मोठे तीर्थ आहे. आई म्हणजेच पांडुरंगाचे रूप आहे. तिच्या दीर्घायुष्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे हेच खरे कर्तव्य आहे.” मातोश्रींना शतायुष्य लाभावे तसेच भविष्यात सहस्रचंद्रदर्शन सोहळाही अशाच उत्साहात साजरा व्हावा, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

आपल्या भावनिक मनोगतात सिताराम पाटील गायकर म्हणाले, “मातोश्रींचा अभिष्टचिंतन सोहळा आणि नव्या वास्तूची वास्तुशांती असे दोन महत्त्वाचे कार्यक्रम आज एकत्र पार पडत आहेत. या गावाने आणि या परिवाराने मला घडवले आहे.” आपल्या कार्यकर्तेपणाच्या प्रवासाची आठवण सांगताना त्यांनी नमूद केले की, “मी सुरुवातीला एक छोटा कार्यकर्ता होतो. सोसायटीत सेल्समन म्हणून काम करत होतो. भाऊसाहेब हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली आणि त्यातूनच आजचे स्थान प्राप्त झाले.”

गेल्या काही महिन्यांपासून प्रकृती अस्वस्थ असतानाही हा पहिला सार्वजनिक कार्यक्रम म्हणून उपस्थित राहिल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, “हा केवळ कार्यक्रम नाही, तर आईचा सन्मान आहे.”

प्रभावी भाषणात शंकरजी गायकर म्हणाले, “ज्या आईच्या प्रेमामुळे इतका मोठा जनसमुदाय येथे एकत्र आला आहे, ती माऊली खऱ्या अर्थाने भाग्यवान आहे. जिवंतपणी आईचा सन्मान करणे हेच मोठे पुण्य आहे.”

आईच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना त्यांनी सांगितले, “आई हिमालयाएवढी उंच आणि सागराएवढी खोल असते. तिच्या त्याग, संयम आणि प्रेमाची उपमा शब्दांत देता येत नाही.”

समाजातील निराधार मातांच्या प्रश्नावर भाष्य करत त्यांनी सांगितले की, आईचे महत्त्व ओळखणे आणि तिची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण सोहळा आनंदी, भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला.

सदर सोहळ्याचे आयोजन ॲड. के. बी. हांडे, ॲड. सौ. मंगल के. हांडे, श्री. नामदेव बबनराव हांडे, सौ. साधना नामदेव हांडे तसेच समस्त हांडे परिवार यांच्या वतीने करण्यात आले होते.

## काना मात्रा उकार वेलांटीने सजलेली आपली मराठी भाषा

- गुलाबराव पाटील

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**



कविता नाटक, कथा, कादंबरी चारित्र्य अशा विविध रूपात नटलेल्या विद्यार्थ्यांनी सम्राट अशोक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा केला. यावेळी वारकरी, सावित्रीबाई, मीराबाई, बहिणाबाई,संत तुकाराम, गाडगे बाबा, शांता शेळके अशा साहित्यिकांच्या भूमिकेत विद्यार्थी अवतरले होते. कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी मराठी लोकगीतेच्या नृत्यातून केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष कुसुमाग्रजांच्या भूमिकेतील इयत्ता आठवीचा विद्यार्थी आयुष तपासे होता. साहित्यिकांच्या भूमिकेतील विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देत मराठी भाषेत आपले महत्व थोडक्यात सांगितले कथा, कविता, नाटक,कादंबरी अशा विविध रूपात आलेल्या विद्यार्थ्यांनीही मराठी भाषेत असलेले आपले योगदान सांगितले.

विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे सहशिक्षक ओमप्रकाश धनविजय व रामदास बोऱ्हाडे यांचे मार्गदर्शन लाभले मुख्याध्यापक गुलाबराव पाटील म्हणाले.मराठी भाषा ही काना, मात्रा, उकार,वेलांटी ने सजलेली आहे बोलायला सोपी आहे परंतु लिहायला कठीण आहे. आपण सर्वांनी सुंदर अक्षरात मराठी भाषा लिहिली पाहिजे जोपासली पाहिजे. आपल्या भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने अधिकच महत्त्व प्राप्त झाले असेही म्हणाले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष पी.टी. धनविजय माध्य. मुख्याध्यापक गुलाबराव पाटील व प्राथमिकच्या प्रभारी मुख्याध्यापिका विजया तांबे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीची अभिलाषा कदम या विद्यार्थिनीने केले. तर पल्लवी कुर्टे या विद्यार्थिनीने उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## संवाद यात्रा उत्साहात संपन्न!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मतदारांमध्ये स्वतःच्या हक्कांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शेतकरी, विद्यार्थी, महिला वर्ग तसेच रोजगाराच्या संधी व राजकीय लोकप्रतिनिधींकडून असलेल्या अपेक्षा या विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सखोल चर्चा व विचारविनिमय करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज कोळेवाडी (कळंब) येथे ग्रामस्वराज्य परिवर्तन संवाद यात्रा उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमात स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपल्या समस्या, अपेक्षा व सूचना मांडल्या.

## कृत्रिम फुले वापरल्यास डेकोरेटर्सवर कठोर कारवाई

- फुल व्यापारी संघटनेकडून स्वागत

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



जैविकदृष्ट्या विघटनशील नसलेल्या साहित्यापासून तयार केलेल्या कृत्रिम फुलांवर राज्यात बंदी आहे. अशा फुलांचा वापर केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिला. या निर्णयाचे फुल व्यापारी संघटनेच्या वतीने कार्याध्यक्ष तथा एस आर फ्लॉवर्स चे संचालक संदीप मालुंजकर यांनी स्वागत केले. या बंदीबाबत अधिक स्पष्टता यावी यासाठी स्वतंत्र शासन निर्णय (जीआर) काढण्यात येणार असून डेकोरेटर्स तसेच अशा सजावटीस परवानगी देणाऱ्या मोठ्या मॅरेज हॉल्स आणि इव्हेंट स्थळांनाही जबाबदार धरण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. विधानसभेत या प्रश्नांसंदर्भात झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी याविषयी अधिक स्पष्टतेसाठी जीआर जारी करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी आमदार जयंत पाटील यांनीही उपप्रश्नांद्वारे फूल उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मांडला. कृत्रिम फुले आणि प्लास्टिक सजावटीच्या साहित्यामधील रसायनांमुळे डोकेदुखी, त्वचाविकार, डोळ्यांची जळजळ तसेच लहान मुलांमध्ये श्वसनाचे त्रास उद्भवतात. दीर्घकालीन संपर्कामुळे कर्करोगाचा धोका वाढत असल्याचे संशोधनातून समोर आल्याचा दावा आ.विक्रम पाचपुते यांनी केला. ही फुले नद्या किंवा इतर जलस्रोतांत विसर्जित केल्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होते. विधानसभेतील या विषयावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, सध्या कृत्रिम फुलांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला असून ही फुले इतक्या कुशलतेने तयार केली जातात की ती खरी की कृत्रिम हे ओळखणेही कठीण जाते. मात्र, या वापरामुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे आणि नैसर्गिक फुले उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे यासंदर्भातील कारवाई पर्यावरण विभागाकडून अधिक प्रभावीपणे करण्यात येईल. गरज भासल्यास इतर संबंधित विभागांचाही यात समावेश केला जाईल, असे त्यांनी सांगितले. मुंबई पालिकेने फेरीवाल्यांवर केलेल्या कारवाई दरम्यान दादरसह मुंबईतील अन्य फुलांचे बाजार बंद केल्याची माहिती सदस्यांनी मांडली. त्यामुळे फुल विक्रीवर मंदीची लाट निर्माण झाली होती.पर्यायाने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक फटका बसत होता.त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, कोणतेही फूल मार्केट बंद करण्यात आलेले नाही. अतिक्रमणविरोधी कारवाईदरम्यान काही विक्रेते विस्थापित झाले असतील, तर त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील. सनातन संस्कृतीत फुलांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याने फुलांचे मार्केट सुरू राहणे आवश्यक आहे. त्यामुळे फुलांचा व्यापार व बाजारपेठा सुरळीत चालाव्यात यासाठी महापालिकेला आवश्यक ते आदेश दिले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

## सोलापूर महापालिकेत भाजपचे मनीष केत स्वीकृत नगरसेवक



**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**

### निवडीनंतर राजकीय वर्तुळात हालचालींना वेग!

भारतीय जनता पार्टी (भाजप)चे कार्यकर्ते तथा पत्रकार मनीष केत यांची सोलापूर महानगरपालिका येथे स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याने शहराच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात विविध घडामोडींना वेग आला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या या निवडीमुळे भाजपच्या स्थानिक राजकारणात नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे.

मनीष केत यांच्या निवडीचे स्वागत करत सोलापूर श्रमिक पत्रकार संघ तसेच ‘इन न्यूज’च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पत्रकारितेतून सामाजिक प्रश्न मांडणाऱ्या केत यांना नगरसेवकपदी संधी मिळाल्याबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव झाला. नगरसेवकपदी निवड झाल्यानंतर केत यांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे चेतन नरोटे आणि शिवसेना चे अमोल शिंदे यांनी सभागृहात केलेल्या विधानांबद्दल माफी मागावी, अशी ठाम मागणी केली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे महापालिकेतील सत्ताधारी व विरोधकांमध्ये राजकीय वातावरण तापले आहे.

महापालिकेत भाजपच्या वाट्याला आलेल्या स्वीकृत नगरसेवकांच्या जागांवरून मोठा राजकीय पेच निर्माण झाला होता. सुरुवातीला काही नावे वगळल्याने पक्षांतर्गत नाराजी व गदारोळाची परिस्थिती निर्माण झाली होती. अखेर चर्चेनंतर मनीष केत यांच्यासह भाजपच्या आठ सदस्यांची वर्णी लागल्याने या प्रकरणावर पडदा पडला.

पत्रकारितेचा अनुभव आणि संघटनात्मक कामाच्या जोरावर केत शहरातील प्रश्नांवर ठाम भूमिका घेतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे महापालिकेतील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून वर्तवली जात आहे. सोलापूरच्या राजकारणात पुढील काळात या घडामोडींचा काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मार्गदर्शक दुवा निखळला

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

विद्वत्ता, तत्वनिष्ठ आणि, लोकाभिमुखता यांचा त्रिवेणी संगम असलेल्या माजी खासदार प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक असा दुवा निखळला आहे, अशी भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, माजी खासदार, माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, प्रा. डॉ. वाघमारे यांचा इंग्रजी भाषा आणि साहित्यासह अर्थशास्त्र, राज्यशास्त्राचा गाढा अभ्यास होता. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अध्यापन आणि प्रशासन या अंगाने मोठा ठसा उमटवला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी प्रभावी कार्य केले.

## बंद कंपन्यांतील कामगारांचा आवाज विधानसभेत घुमला

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




ठाण्यातील बंद कंपन्यांमधील कामगार देशोधडीला लागले, शेकडो मृत्यू पावले, पण त्यांची थकबाकी काही मिळाली नाही. राज्य शासनाने यात हस्तक्षेप करून अशा कामगारांसाठी ठोस उपायोजना राबवण्याची गरज आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केली. कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी अशा कंपन्यांसदर्भात लवकरच बैठक घेऊन कामगारांच्या हिताचा निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात ठाण्यातील बंद कंपन्या आणि कामगारांच्या थकबाकीचा मुद्दा उपस्थित केला. ठाण्यातील मफतलाल कंपनी बंद पडली. त्यातील शेकडो कामगार देशोधडीला लागले, मृत्यू पावले पण त्यांची थकबाकी काही मिळाली नाही. इंडियन रबर कंपनी देखील बंद पडली. या कंपनीची जागा विकण्यात आली. त्यातील काही जमीन महापालिकेने क्लस्टर योजनेसाठी संपादित केली. दरम्यान यातील २५०-३०० कामगार थकबाकी मिळण्यासाठी लढा देत देत मृत्यूही पावले, तरीही कामगारांना थकबाकी मिळाली नाही. एकूणच कंपन्या बंद होत असताना हजारो कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबांना वाऱ्यावर सोडण्यात आले. त्यांच्यापाठी राज्य सरकारने ठामपणे उभे राहण्याची गरज असून अशा प्रकरणात राज्य शासनाने हस्तक्षेप करण्याची गरज असल्याचे मत श्री.केळकर यांनी व्यक्त केले. कंपनी बंद पडल्यानंतर कामगारांची थकबाकी दिल्याशिवाय जागा विकता येणार नाही, किंवा त्यावर कोणताही नवीन प्रकल्प उभारता येणार नाही किंवा एखाद्या योजनेसाठी जमीनही संपादित करता येणार नाही अशी तरतूद करण्याची गरज असून ठराविक मुदतीतच कामगारांना संपूर्ण थकबाकी मिळावी अशी ठोस उपाययोजना शासन करणार आहे का? असे प्रश्न श्री. केळकर यांनी उपस्थित केले. यावर उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी अशा बंद कंपन्या आणि कामगार या संदर्भात लवकरच एक बैठक आयोजित करण्यात येईल, आणि विहित मुदतीत कामगारांना त्यांची थकबाकी मिळेल, अशी योजना करण्यात येईल, असे श्री. फुंडकर यांनी सांगितले.

## कृषी व बागायती विभागाची पोलखोल

**डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)**

गुजरातमधील पहिला संपूर्ण नैसर्गिक शेती करणारा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या डांगमध्ये आज एक धक्कादायक प्रकार घडला. नैसर्गिक शेतीचे प्रणेते आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित ‘शेतकरी परिसंवाद’ कार्यक्रमात प्रशासनाची बेपर्वाई उघड झाल्याने राज्यपालांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. डांग जिल्हा रसायनमुक्त करण्याच्या शासनाच्या आवाहनानंतर राज्यपाल वेळोवेळी येथे भेट देत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत असतात. रविवारी आयोजित कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना ‘जीवामृत’ तयार करण्याच्या पद्धतीबाबत प्रश्न विचारले असता, बहुसंख्य शेतकरी अनभिज्ञ असल्याचे समोर आले. यामुळे मंचावर उपस्थित आत्मा (ATMA), कृषी व बागायती विभागातील अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षणच देण्यात आले नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी जाहीर मंचावरूनच अधिकाऱ्यांना खडसावले. त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कृषी सहाय्यकांना तात्काळ जीवामृत तयार करण्याचे प्रत्यक्ष व सखोल प्रशिक्षण द्यावे. जर कृषी सहाय्यक आपले कर्तव्य पार पाडू शकत नसतील किंवा प्रशिक्षण देण्यात अपयशी ठरत असतील, तर त्यांची बदली करण्यात यावी. सरकारच्या प्रयत्नांनंतरही तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत आवश्यक ज्ञान का पोहोचत नाही, याची जबाबदारी निश्चित करण्याचे आदेशही त्यांनी दिले. राज्यपालांच्या थेट हस्तक्षेपानंतर डांग जिल्ह्यातील प्रशासन आणि कृषी विभागात खळबळ उडाली असून, नैसर्गिक शेतीच्या नावाखाली केवळ कागदोपत्री कामकाज चालत असल्याची बाब उघड झाली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभर पोहोचविण्याच्या दिशेने मोठे पाऊल

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**नाशिक: (समर्थ गांवकरी)**



स्वराज्य संकल्पक शाहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शाहाजीराजे भोसले जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे मूळ घराणे असलेल्या ऐतिहासिक वेरूळ(छत्रपती संभाजी नगर) येथे हा भव्य सोहळा बुधवार दिनांक १८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजतापार पडणार असून स्वराज्याचा इतिहास देशभर पोहोचविण्याचा संकल्प या निमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

या जयंती महोत्सवाचे निमंत्रण मालेगाव येथे महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा.दादाजी भुसे यांना देण्यात आले.यावेळी जयंती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना मंत्री भुसे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी राज्य शासनाकडून ऐतिहासिक निर्णय प्रक्रियेला गती देण्यात आल्याचे सांगितले.

महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी, वस्तुनिष्ठ व राष्ट्रप्रेरक इतिहास शालेय अभ्यासक्रमात अधिक व्यापक स्वरूपात समाविष्ट करण्याची मागणी केली होती.त्यानुसार चौथीच्या पाठ्यपुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला तब्बल २५ पानी स्वतंत्र स्थान देण्याबाबत सकारात्मक निर्णय प्रक्रियेला सुरुवात झाल्याची माहिती त्यांनी दिली.

या महत्त्वपूर्ण पाठपुराव्यामध्ये शालेय शिक्षण मंत्री मा.दादाजी भुसे यांनी सक्रिय भूमिका बजावत केंद्र शासनाशी सातत्याने संवाद साधला.त्यांच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे यांनी या ऐतिहासिक उपक्रमाला ठाम व सकारात्मक साथ दिली.राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता देशभरातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातून शिकण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय पातळीवर स्वराज्य,आदर्श प्रशासन,शौर्य,लोककल्याणकारी शासनव्यवस्था आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे मत जयंती महोत्सव समितीने व्यक्त केले.राज्य शासनाची ही भूमिका ऐतिहासिक परंपरेचा सन्मान करणारी आणि राष्ट्रीय अभिमान वृद्धिंगत करणारी ठरणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान,स्वराज्य संकल्पक शाहाजीराजे भोसले जयंती महोत्सव कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे आश्वासन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वराज्याचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा जपण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

स्वराज्याच्या विचारांचा वारसा जपत स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी जयंती महोत्सवाचे निमंत्रण देण्यासाठी जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण, जयंती महोत्सव अध्यक्ष विलास पांगरकर,छावा क्रांतिवीर सेना संस्थापक अध्यक्ष करण गायकर तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य भिकन आबा शेळके,अक्षय राजे ताठे,मच्छिंद्र घोरपडे,प्रवीण खरात,कैलास शिंदे, अनिल सूर्यवंशी,अनिल भोईटे,समाधान दिघे,युवराज डुंबरे उपस्थित होते.

# नियमित पोलीस बंदोबस्त पॉईंट सुरु

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नियमित पोलीस बंदोबस्त पॉईंट द्यावा अशी मागणी, खा. रवींद्र चव्हाण व काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शना खाली सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी शिष्टमंडळासह शनिवार दि २८ फेबुवारी रोजी केली होती दरम्यान मागणीला जलद प्रतिसाद देत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी रविवार दि. ०१ मार्च पासून हडको बस्टॉप येथे नियमितपणे पोलीस बंदोबस्त सुरु केला आहे. रविवारी एक पोलीस उपनिरीक्षक, एक पोलीस व तीन होमगार्ड आदींचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निर्णयाचे सिडको काँग्रेसच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.



हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा पाच शाळा, चार मंगल कार्यालय, आठ दहा प्रार्थना स्थळे, एक वैद्यकीय महाविद्यालय, हडको मुख्य बाजार पेठ, रविवार आठवडी बाजार व छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक असलेला मध्यवर्ती भूभाग आहे. या भागातील असुरक्षितता दिवसेंदिवस वाढत असल्याने सदर चौकात नियमित पोलीस बंदोबस्त पॉईंट द्यावा अशी मागणी सिडको काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या वतीने शनिवार (ता.२८) रोजी करण्यात आली होती. यावेळी, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा आरती डोईबळे, काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी प्रल्हाद गव्हाणे, लतिफ शेख, मोईन शेख लाठकर आदीसह इतर काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. सदर मागणीला जलद प्रतिसाद देत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी रविवार दिनांक ०१ मार्च पासून नियमितपणे पोलीस बंदोबस्त सुरु केला आहे. पहिला दिवशी एक पोलीस उपनिरीक्षक, एक पोलीस, तीन होमगार्ड आदींचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निर्णयाचे सिडको काँग्रेसच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.



ठाणे : दिव्यात कै. प्रकाश धोंडू भाबल चॅरिटेबल ट्रस्टचा १४ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थापक, अध्यक्ष महादेव प्रकाश भाबल, उपाध्यक्ष सुहास डिचोलकर, सचिव शितल लाड, उपसचिव गणेश भाबल, खजिनदार गौरी बेर्ड, सल्लागार सुनिता मेस्त्री तसेच प्रल्हाद भाबल आदी मान्यवरांच्या उपस्थितीत केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी ट्रस्टचा लेखाजोखा मांडून कार्याचा अहवाल सादर करुन मान्यवरांचा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### भास्कर हंबर्डे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार व सन्मान

नांदेड (स. गांवकरी) : पिएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी यांच्या वतीने छावा श्रमिक संघटना मराठवाडा अध्यक्ष तथा जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष भास्कर हंबर्डे यांना शिवजन्मोत्सव निमित्ताने नांदेड येथे मराठा भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना दि २८ फेब्रुवारी रोजी मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शाल श्रीफळ देऊन मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे वेळो वेळी अनेक कार्यक्रम व स्पर्धा परिक्षा यासह अनेक कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या सामाजिक , शैक्षणिक चळवळीतील कार्याची दखल घेत भास्कर हंबर्डे यांना शिवजन्मोत्सव समिती नांदेड यांच्या वतीने मराठा भुषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व शाळेतील शिक्षीका अनिता ऊध्दंत यांना दैनिक लोकमत तर्फे पुरस्कार मिळाल्याबद्दल शाल श्रीफळ देऊन पिएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे दि २८ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, शिक्षण विस्तार अधिकारी, बालासाहेब कच्छवे,सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे,शंकर हंबर्डे, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिक हंबर्डे, शिलानंद सौनकांबळे, मुख्याध्यापक उज्वलाताई जाधव, पत्रकार रमेश ठाकूर यांच्या उपस्थितीत सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

### ओम साई सेवा मंडळ आयोजित कुमशेत ते शिर्डी पायी पालखी सोहळा



शिवनेरी (स. गांवकरी) : ओम साई सेवा मंडळ आयोजित १५ व्या वर्षी कुमशेत ते शिर्डी पायी पालखी सोहळा रविवार दि. १ रोजी स. ८ वा . ग्रामदैवत हनुमान मंदिर येथून पारंपारिक वाद्य व फटाक्याची आतिश बाजी ने स्वागत करण्यात आले . या पालखी सोहळ्याचे आमदार शरद सोनवणे यांनी दर्शन घेऊन सर्व साई भक्तांचे स्वागत केले . साई पालखी समोर आमदार शरद सोनवणे यांनी साई भक्तमहिला भगिनींबरोबर फुगड्याचा आनंद घेतला . ग्रामदैवत हनुमान मंदिर ते कुमशेत फाटा पर्यंत महिला भगिनींनी घरासमोर सुंदर रांगोळ्या काढून साई पालखीचे स्वागत सर्व ग्रामस्थांनी मनोभावे पूजा विधि संपन्न केली . गावातील ग्रामदैवत हनुमान मंदिर , साई मंदिरात व दत्त मंदिरात पालखी नेण्यात आली .याप्रसंगी साई भक्तांनी अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज परब्रम्ह । श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय..... , साईनाथ महाराज की जय..... , श्रद्धा -- सबुरी , पायी हळु हळु चाला । मुखाने साईबाबा बोला..... अशा गर्जना यावेळी देण्यात आल्या . कुमशेत फाटा मार्गे , बनकर फाटा , ओतूर , आळेफाटा, बोटा , घारगाव , माऊली , संगमनेर , समनापुर , निळवंडे , काकडी , कोर्हाळे व शिर्डी येथे साईबाबा चे दर्शन घेणार आहे . सर्व साईभक्त बोटा , चंदनापरी घाट विठ्ठल विसावा , निळवंडे टेकडी मारुती मंदिर व कोर्हाळे साई मंदिर या ठिकाणी साई भक्तांचा मुक्काम होणार आहे . गुरुवार दि. ५ रोजी कुमशेत फाटा पासून साई पालखीची ग्रामदैवत हनुमान मंदिर पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे . सायं . ठीक ७ वा . साई भंडारा, भव्य मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# दिव्यात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते नगरसेवकांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाट्न

**नगरसेवक आदेश भगत व नगरसेविका दीपाली भगत यांच्या कार्यालयाचे लोकार्पण**

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलनी येथे शिवसेना नगरसेवक अँड. आदेश भगत यांच्या तर सिद्धिविनायक गेट येथे शिवसेना नगरसेविका दीपाली उमेश भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे आज खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. दिवेकर मतदारांनी सदर नगरसेवकांना मोठ्या मताधिक्याने निवडून दिले आहे. नगरसेवक म्हणून जबाबदारी पार पाडत असताना विभागाच्या विकासासमवेतच नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर देखील भर देण्यात यावा. तसेच नव्याने सुरु करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयांच्या माध्यमातून नागरिकांची कामे कशा पद्धतीने मार्गी लावता येतील यासाठी कार्यरत राहावे असे यावेळी खासदारांनी स्पष्ट केले. तर नगरसेवक आदेश भगत आणि नगरसेविका दीपाली उमेश भगत यांना नव्या जनसंपर्क कार्यालयासाठी शुभेच्छा दिल्या. प्रसंगी खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिवा शहराचा विकास तसेच दिवा मुंबई लोकल, उड्डाणपूल, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वारूढ पुतळा ही कामे लवकरच मार्गी लागतील असे स्पष्ट केले. सदर सोहळ्यास आमदार राजेश मोरे, दिवा शहरप्रमुख व नगरसेवक रमाकांत मढवी, नगरसेवक शैलेश पाटील, बाबाजी पाटील, दीपक जाधव, नगरसेविका साक्षी मढवी, अर्चना निलेश पाटील, स्नेहा अमर पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, नितीन पाटील, उपशहर प्रमुख गणेश मुंडे, विभाग प्रमुख गुरुनाथ पाटील, उमेश भगत यांच्यासह अनेक स्थानिक शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एज्युव्हिजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये 28 फेब्रुवारी 2026 रोजी जागतिक विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवा निवृत्त शिक्षक पांडुरंग बोबडे,प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर, अध्यक्ष गुणवंत विरकर,साई कम्प्युटरचे संचालक नागेश खरसकर यांची उपस्थिती होती. आजच्या विज्ञान प्रदर्शनाचे विशेष म्हणजे शाळेतील एकूण 110 विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या मधील असणाऱ्या कलागुणांचे सादरीकरण केले आहे. स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना टिकवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शाळेने भव्य अशा विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते.

# प्रा. डॉ. रामप्रसाद तौर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र यांच्या वतीने नांदेड येथील सायन्स कॉलेज मैदानावरील राजा ढाले साहित्य नगरी येथे आयोजित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात (दि.२८) रोजी किनवट येथील प्रा. डॉ. रामप्रसाद तौर यांना "विद्रोही जीवन गौरव पुरस्कार" प्रदान करण्यात आला. साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात दीर्घकाळ केलेल्या कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. प्रा. तौर हे १९८७ पासून किनवट येथील बळीराम पाटील महाविद्यालयात अध्यापन करीत असून बंजारा व आदिवासीबहुल या दुर्गम भागात सत्यशोधक विचारांचा प्रसार आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन हे त्यांचे कार्य सुरू आहे. मराठी साहित्य समीक्षा हेही त्यांच्या कार्याचे एक महत्त्वाचे अंग आहे. स्वागताध्यक्ष राहुल एस. एम. प्रधान यांच्या हस्ते व राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व मानपत्र असे होते. हे संमेलन दि. २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले असून यात साहित्यिक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविणे गरजेचे

- माजी उपसभापती प्रशांत
- जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा

**मिरजगाव : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक वृत्ती विकसित होणे अत्यंत आवश्यक असून वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविणे आणि विज्ञानाची आवड निर्माण होणे गरजेचे आहे. विज्ञान हे केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित नसून आपल्या प्रत्येक कृतीत आणि निर्णयात विज्ञान दडलेले असल्याने विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला विज्ञानाची जोड मिळणे गरजेचे आहे, असे मत कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत बुद्धीवंत यांनी व्यक्त केले.

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील जिजाई चॅरिटेबल ट्रस्ट संचालित जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये डॉ.सी.व्ही.रमण यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उदघाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध प्रयोगांची मांडणी केली होती. या प्रदर्शनास पालक व माता भगिनी स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमास माजी उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष केशव शिंदे सर, डॉ.सुभाष सूर्यवंशी, पत्रकार बबन म्हस्के, संस्थेचे सचिव क्रिश केशव शिंदे, संस्थेच्या सल्लागार शर्मिला केशव शिंदे, सहशिक्षिका उर्मिला त्र्यंबके, सरिता काळाने, सुरेखा शेलार, निकिता माळवदे, प्रियदर्शनी मुंगीकर, अनिता ननवरे, तृप्ती शिंदे, श्वेता वतारे, आशा पवार, दत्ता सकट, पांडुळे मामा, सूर्यकांत सकट, अनिकेत सकट आदींसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

केशव शिंदे म्हणाले, विज्ञान दिनासारखे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवतात आणि संशोधनाची प्रेरणा देतात. विज्ञानाच्या प्रसारासाठी स्कूल सातत्याने प्रयत्नशील राहील, असे त्यांनी सांगितले.

प्रदर्शनाच्या शेवटी उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या बालवैज्ञानिकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१२/२०२५ अकोले दि. २६/०२/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. सुनिल विठ्ठल हुलवळे, रा.जांभळे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. विठ्ठल उर्फ विठोबा भाऊ हुलवळे यांचा मृत्यू दि. २२/१२/१९९५** रोजी **मौजे मन्याळे** येथे झाला असुन त्यांच्या **वडीलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मन्याळे**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. सुनिल विठ्ठल हुलवळे, रा.जांभळे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे वडील कै. विठ्ठल उर्फ विठोबा भाऊ हुलवळे यांचा मृत्यू दि. २२/१२/१९९५** रोजी **मौजे मन्याळे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मन्याळे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २६/०२/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# पडघ्यात ड्रेनेज चेंबरचे झाकण उचलले; गंभीर अपघाताचा धोका

## तळवली-अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष ; नागरिकांत जीवितहानीची भीती

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील तळवली-अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील पडघा येथे भादाणे पुलाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ड्रेनेज लाईनच्या चेंबरचे झाकण गेल्या चार दिवसांपासून विस्कटलेल्या अवस्थेत असून वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. सदर झाकण अर्धवट खाली गेले असून अर्धवट वर आलेले असल्याने ते असंतुलित स्थितीत आहे. या मार्गावर दुचाकी, चारचाकी आणि रिक्षांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. पुढे शाळा असल्याने सकाळी व दुपारी विद्यार्थी व पालकांची गर्दी होते. अशा परिस्थितीत रस्त्याच्या मध्यभागी असलेले धोकादायक चेंबर केव्हाही मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकते, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः आठवडा बाजाराच्या दिवशी या रस्त्यावरून नागरिकांची मोठी ये-जा होत असल्याने धोका अधिक वाढला आहे. स्थानिकांच्या मते, सुमारे चार दिवसांपूर्वी या तुटलेल्या चेंबरबाबत संबंधित प्रशासनाला माहिती देण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वीही याच ठिकाणी चेंबरचे झाकण तुटले होते. तेव्हा दुरुस्ती करण्यात आली; मात्र झाकण नीट बसविण्यात न आल्याने काही महिन्यांतच पुन्हा झाकण आत गेले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पत्रकार कैलास ढमणे यांनीही घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ तळवली-अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायतीला कळविले आहे. तरीही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. "अशा निष्काळजीपणामुळे एखादा अपघात होऊन जीवितहानी झाली तर जबाबदार कोण?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून अपघाताचा धोका दूर करावा, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे. आता ग्रामपंचायत त्वरित उपाययोजना करते की एखादी दुर्घटना घडण्याची वाट पाहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांचे कार्य अजरामर

**निळकंठ मदने**

**अर्धापूर :** (समर्थ गांवकरी)



राजकीय व सामाजीक जीवनात डॉ.शंकरराव चव्हाण यांनी काम करतांना राज्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या आयुष्यांचा विचार करून राजकीय विरोध झुगारून राज्यात असंख्य धरणांचे निर्माण करून शेतकरी,शेतमजुर,कामगार व व्यापारी या सर्वांचे वर्षानुवर्षे कल्याण केले,त्यामुळे त्यांचे कार्य अजरामर राहीन असे प्रतिपादन कृषी ऊत्पन्न बाजार समितीचे संचालक निळकंठराव मदने यांनी मोफत तपासणी व शिबीर प्रसंगी केले. कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमीत्य पार्डी(म) येथे शुक्रवारी मोफत आरोग्य तपासणीत ७० वर्षाच्यासाठी कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य कार्ड योजना सर्व महत्वाच्या विषयाच्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृऊबाचे संचालक निळकंठराव मदने हे होते तर प्रमुख पाहुणे तालुका आरोग्य अधीकारी श्रीकांत देशाई,डॉ.एस पी गोखले,डॉ.पल्लवी फिसके, ग्रामविकास अधीकारी शिवकुमार देशमुख,पी.एल. मदने यांची उपस्थीती होती.यावेळी मोफत आरोग्य तपासणी करून,महिलांची रक्त तपासणी करून आयुष्यमान कार्डाचे वितरण व गोल्ड कार्डासाठी नोंदणी करण्यात आली.यावेळी निळकंठ मदने यांनी कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर अधिकाऱ्यांनी शासकिय योजना जनसामान्यापर्यत पोहचविण्याठी उपाययोजना सांगीतल्या.यावेळी भाऊराव मदने,पुंजाराम मदने,कल्याणराव हापगुंडे,माधवराव कवडे,सुनिल मदने,बाजीराव मदने,राजकुमार मदने,प्रसाद हापगुंडे,रूस्तुमसाब,एस एस यादव,एस एस मांजरमकर,श्रीमती एस जी खरटमोल,एल एस वाखरडे,श्रीमती अनिता चव्हाण,गुणाबाई कांबळे,सरस्वतीबाई कांबळे,माया कांबळे,मंदीबाई नरोटे,स्वाती कांबळे,लता दाढेल,निकीता मोहन,रोमा मदने,अंबिका हापगुंडे,शेख आफ्रीन,सारीका मदने,शिवशंकर दहिभाते,राम इबितवार,शेख गुलाब,नवनाथ मरकुंदे,बालाजी मरकुंदे,अवघूत वाघमोडे,दिपक कांबळे,रमेश कांबळे यांची उपस्थीती होती.

# पी.एस.आय. एस. बी. टंडेल यांच्या वर्तनाविरोधात संताप

**डांग.गुजरात:** (समर्थ गांवकरी)



डांग जिल्ह्याच्या मुख्यालय आहवा येथे सध्या आदिवासी समाजाच्या गौरवाचा आणि ऐतिहासिक ओळखीचा लोकउत्सव डांग दरबार मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. होळीपूर्वी भरवला जाणारा हा मेळा आदिवासी बांधवांसाठी वर्षातील सर्वात महत्त्वाचा आणि आनंदाचा उत्सव मानला जातो. जिल्ह्यातून तसेच आसपासच्या भागांतून मोठ्या संख्येने नागरिक कुटुंबासह मेळ्याचा आनंद लुटण्यासाठी उपस्थित राहत आहेत.

मात्र या उत्सवी वातावरणात शनिवारी रात्री मेळ्यात बंदोबस्तावर असलेल्या पी.एस.आय. एस. बी. टंडेल यांच्या वर्तनाबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी ज्येष्ठ नागरिक, स्टॉलधारक आणि राईड चालकांशी अयोग्य वर्तन केल्याचा तसेच अपमानास्पद भाषेचा वापर केल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही निरपराध नागरिकांना विनाकारण अडवून त्रास दिल्याच्या चर्चेमुळे स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे. घटनेचे पडसाद इतके उमटले की हा विषय वलसाड-डांग मतदारसंघाचे खासदार ( सांसद )धवलभाई पटेल यांच्यापर्यंत पोहोचला. सूत्रांच्या माहितीनुसार, खासदारांनी मध्यस्थी करत परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्याकडून जर असे वर्तन झाले असेल, तर ते अत्यंत दुर्दैवी असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. मेळ्यासारख्या सार्वजनिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात पोलिस प्रशासनाने संवेदनशील व सहकार्यशील भूमिका घेणे अपेक्षित असते. दरम्यान, घटनेतील प्रभावित नागरिक आणि ज्येष्ठांनी राज्याच्या गृहमंत्र्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू केल्याची माहिती आहे. उच्चस्तरीय निष्पक्ष चौकशी करून संबंधित महिला पी.एस.आय.ची बदली करावी, अन्यथा येत्या काळात आंदोलन तीव्र होऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. डांग दरबारसारख्या प्रतिष्ठित लोकउत्सवात नागरिकांना संरक्षण आणि सहकार्य मिळाले पाहिजे, त्रास नव्हे – या ठाम भूमिकेसह पी.एस.आय. एस. बी. टंडेल यांच्याविरोधात तात्काळ, पारदर्शक आणि कायदेशीर चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

# शिवकालीन युगात स्त्रियांना मिळणारा सन्मान मिळविण्या साठी मुलींनी निर्भय बनले पाहिजे : रविंद्र भोर

**शिवनेरी :** (समर्थ गांवकरी)




छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपणास जीवनामध्ये योग्य ते मार्गदर्शन करते, तसेच जीवनात यश मिळवण्यासाठी आपण त्यांचे गुण अंगीकारावे,शिवकालीन युगामध्ये स्त्रियांना जो सन्मान मिळत होता तो सन्मान आज कालच्या परिस्थितीतही मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे त्याचबरोबर प्रत्येक मुलीने निर्भय बनले पाहिजे असे आवाहन करिअर मार्गदर्शक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष,तथा जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी केले

डुंबरवाडी ता:-जुन्नर येथील गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या विद्यार्थिनींना निर्भय कन्या अभियाना अंतर्गत व्याख्यान आयोजित केले होते यावेळी ते बोलत होते प्राचार्य खरात, तायकोंदो राष्ट्रीय रेफरी किरण जयकर,स्पोर्ट टीचर आरती बनसोडे,विभागप्रमुख ,प्रा.निता बाणखेले,विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.मोनिका रोकडे, विभागप्रमुख -प्रा. पूजा घोलप, प्रा.पूजा निघोजकार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सदर अभियान राबविताना छत्रपती शिवाजी महाराजांनी महिला सबलीकरण महिलांचा व्यक्तिमत्व विकास,सियांची प्रेरणास्थाने,स्त्रीयांचे स्वास्थ्य,महिला उद्यमशीलता, स्त्री-पुरुष समानता,समान संधी, लिंगभाव जागृती सहसंवाद सहवेदना,विवाहपूर्व समुपदेशन, महिलांचा सामाजिक,कौटुंबिक सुसंवाद.विद्यार्थिनी-पालक- शिक्षक परस्पर सहसंवाद, परिस्थितीजन्य निर्णयक्षमता तसेच स्त्री हक्क व अधिकार विषयक नियम संहिता कायदे. स्त्रियांचे घटना व संवैधानिक अधिकार, स्त्रीयांविरुद्ध अयोग्य वर्तन,अन्याय,प्रकारची हिंसा, मानसिक,शारीरिक,सामाजिक इत्यादी स्वरूपाचा आघात, अनुचित शेरेबाजी,अनुचित मागणी,अनुचित विनंती, तसेच इतर कोणत्याही प्रकारची शारीरिक,अशाब्दिक स्वरुपाची अस्वागतार्ह अथवा अस्विकारार्ह वागणूक तसेच स्त्रीयांच्या आत्म सन्मानाला बाधा पोचेल अशा कोणत्याही स्वरूपाच्या वर्तना पासून,अनुभवापासू आणि यांचा प्रतिकार व प्रतिबंध इत्यादी बिंदूवर आधारित विषयाच्या स्वरूपानुसार मार्गदर्शन केले.

# अखिल भारत हिंदू महासभेचा एल्गार!

**पुणे/आळंदी :** (समर्थ गांवकरी)

तीर्थक्षेत्र आळंदीची जीवनवाहिनी असलेल्या आणि लाखो वारकरी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पवित्र इंद्रायणी नदीच्या दुरवस्थेबाबत आता अखिल भारत हिंदू महासभेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. नदीतील वाढते प्रदूषण, सांडपाणी आणि जलपर्णीच्या विळख्यातून इंद्रायणीला मुक्त करण्यासाठी महासभेच्या वतीने प्रशासनाला कडक शब्दांत निवेदन देण्यात आले आहे. अखिल भारत हिंदू महासभेचे वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष वैभवराज रौंदळ आणि नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी पुणे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि आळंदी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे यासंदर्भात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# १३ वर्षांपासून किनवट रेल्वे स्थानकावर अज्ञात युवक

**किनवट :** (समर्थ गांवकरी)



किनवट रेल्वे स्थानकावर गेल्या तेरा वर्षांपासून एक अज्ञात मुलगा वास्तव्य करत आहे. त्याला ना नाव, ना गाव, ना आई-वडील, ना जात-धर्म अशी कोणतीही ओळख नाही. स्थानकावर नियमित येणाऱ्या प्रवाशांनी व स्थानिक नागरिकांनी त्याला आदिलाबाद ते तिरुपती दरम्यान धावणाऱ्या कृष्णा एक्सप्रेस या गाडीचे नाव दिले. तेव्हापासून तो 'कृष्णा' या नावाने परिचित आहे. मात्र या कृष्णाची कायदेशीर ओळख निर्माण करण्यासाठी आजवर कोणतीही शासकीय यंत्रणा पुढे आलेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर असल्याची भावना परिसरातील नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. सुमारे तेरा वर्षांपूर्वी वयाच्या तीन ते चार वर्षांत हा मुलगा किनवट रेल्वे स्थानकावर आढळला. तो कोणाचा, कुठून आला, याची कोणालाही माहिती नव्हती. त्याला स्वतःलाही आपले नाव, आई-वडिलांचे नाव वा मूळ गाव यापैकी काहीही सांगता येत नव्हते. त्यामुळे स्थानकावरील नागरिकांनी त्याचा सांभाळ केला आणि समोर उभ्या असलेल्या कृष्णा एक्सप्रेस गाडीच्या नावावरून त्याला 'कृष्णा' असे संबोधू लागले. आज तोच कृष्णा अंदाजे पंधरा ते सतरा वर्षांचा तरुण झाला आहे.

ज्या वयात मुले शाळेत जाऊन शिक्षण घेतात, घरच्यांच्या मायेत वाढतात, त्याच वयात कृष्णाने स्थानकावरील भिकाऱ्यांच्या व अपंग व्यक्तींच्या सहवासात दिवस काढले. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे तिन्ही ऋतू त्याने उघड्यावर अनुभवले. आई-वडिलांचे प्रेम, शालेय शिक्षण, पोषण आहार व आरोग्य सेवा या सर्व मूलभूत गोष्टींपासून तो कायमचा वंचित राहिला. परिसरातील नागरिक त्याला चांगल्या प्रकारे ओळखत असले, तरी त्याची अधिकृत ओळख निर्माण करण्याचे काम आजवर कोणी केले नाही. कृष्णा आता पौगंडावस्थेत आल्याने त्याला पुढील आयुष्य जगण्यासाठी आधार कार्ड, जन्म दाखला, मतदान ओळखपत्र व शैक्षणिक कागदपत्रे यांची नितांत गरज आहे. मात्र आई-वडील, जात, धर्म व जन्मतारीख यापैकी कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने ही कागदपत्रे मिळवणे अत्यंत कठीण बनले आहे. परिणामी शासकीय योजनांचा लाभ तर दूरच, त्यांची साधी माहितीही त्याला मिळालेली नाही. कृष्णाची ही परिस्थिती म्हणजे शासकीय यंत्रणांच्या उदासीनतेचे ठळक उदाहरण आहे. शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण, बाल संरक्षण कायदे, बाल कल्याण समिती व बाल आयोग या यंत्रणा कार्यरत असताना एक मुलगा तब्बल तेरा वर्षे रेल्वे स्थानकावर उपेक्षित राहतो, हे या सर्व यंत्रणांच्या अपयशाचे निदर्शक आहे. या प्रकरणाची दखल घेत काँग्रेस पक्षाचे ओबीसी विभाग जिल्हा उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी कृष्णाला कायदेशीर मार्गाने कागदपत्रे मिळवून देण्यासाठी उपलब्ध पर्यायांबाबत संबंधित यंत्रणांकडे विचारणा केली आहे. शासनाने तातडीने पुढाकार घेऊन कृष्णाला कायदेशीर ओळख मिळवून द्यावी, जेणेकरून त्याला एक सामान्य नागरिक म्हणून जगता येईल, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. या 'कृष्णा एक्सप्रेस'ची जीवनगाडी यापुढे तरी योग्य दिशेने धावावी, एवढीच त्यांची अपेक्षा आहे.

# जव्हारमध्ये ३,०११ विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट वाटप

**पालघर :** (समर्थ गांवकरी)



होळी सणाचे औचित्य साधत इंडियन डेव्हलपमेंट फाउंडेशन (IDF), मुंबई या सामाजिक संस्थेच्या वतीने जव्हार तालुक्यातील आदिवासी बहुल भागातील ३,०११ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे किट वाटप करण्यात आले. पंचायत समिती जव्हार अंतर्गत असलेल्या पाच केंद्रांतील ५९ जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हा लाभ मिळाला. कार्यक्रम २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडला.

संस्थेच्या 'आशाऐ' या उपक्रमांतर्गत दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवले जाते. सुमारे ४० वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेली ही संस्था २०१४ पासून शैक्षणिक क्षेत्रात विशेष उपक्रम राबवत आहे. यंदा वितरित करण्यात आलेल्या किटमध्ये इयत्तानिहाय वह्या, शालेय बॅग, पेन, पेन्सिल, शार्पनर, खोडरबर, रंग, चित्रकला वही, कंपास आदी साहित्याचा समावेश होता. बेहडपाडा, पवारपाडा-पिंपळशेत, मेढा व कोरतड या केंद्रांतील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यापूर्वी डिसेंबर २०२५ मध्येही संस्थेने जव्हार तालुक्यातील सात केंद्रांतील पाच हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले होते.

कार्यक्रमाला संस्थेचे अनिश पलीवाल, शशांक शेट्टी व मॉन्टी महाराणा उपस्थित होते. तसेच रामनारायण कॉलेज, दहिसर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. केंद्र समन्वयक व शिक्षकांनीही नियोजनात सहभाग घेतला.

जव्हार तालुक्यात एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा हा पहिलाच उपक्रम असल्याचे सांगण्यात आले. साहित्य हाती मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह ओसंडून वाहत होता. होळी सणानिमित्त विद्यार्थ्यांसमवेत रंगोत्सव साजरा करत शिक्षणाचा संदेश देण्याचा प्रयत्न संस्थेने केला. भविष्यातही तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी अधिकाधिक सहकार्य करण्याचा मनोदय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# टॉन्सिल समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)

३ मार्च रोजी साजरा होणाऱ्या जागतिक श्रवण दिनाच्या निमित्ताने बालकांमधील ऍडेनॉईड हायपरट्रॉफी आणि टॉन्सिलायटिस या सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या समस्यांबाबत पालकांनी सजग राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथील कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. पंकज भट यांनी केले आहे. या आजारांचे वेळेवर निदान आणि उपचार न केल्यास मुलांच्या श्रवणशक्तीवर, श्वसनावर तसेच एकूण आरोग्य व विकासावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. डॉ. भट यांनी सांगितले की, ऍडेनॉईड हायपरट्रॉफी म्हणजे नाकाच्या मागील भागातील ग्रंथींची असामान्य वाढ होणे, तर टॉन्सिलायटिस म्हणजे घशातील टॉन्सिलला सूज आणि संसर्ग होणे.

# मयूर कदम यांचा 'रासायनिक शेती' विषयावर उल्लेखनीय प्रबंध

**नांदेड :** (समर्थ गांवकरी)




महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर येथील शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील इयत्ता सहावीचा विद्यार्थी मयूर आनंद कदम याची डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा मध्ये लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेत यश मिळवत पुढील प्रबंध व मौखिक परीक्षेसाठी निवड झाली आहे. मयूरने "रासायनिक शेती : निसर्गासाठी एक हळुवार धोका" या विषयावर प्रकल्प सादर केला आहे. प्रकल्पाच्या पहिल्या सत्रात त्याने महाराष्ट्र शासन कृषी विभाग अंतर्गत मृद सर्वेक्षण व मृद चाचणी, जिल्हा नांदेड येथे भेट देऊन जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी बालाप्रसाद बंदेल , श्यांरी गजानन पडलवार, सहायक कृषी अधिकारी च्यासोबत चर्चा केली. जमिनीचा जिवंतपणा जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच मृद प्रयोगशाळेतील माती परीक्षणाची माहिती त्याने घेतली. दुसऱ्या सत्रात मयूरने कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी येथे भेट देऊन डेमो प्लॉट व विविध प्रात्यक्षिके पाहिली. तेथील शास्त्रज्ञांशी संवाद साधून रासायनिक शेती व सेंद्रिय शेतीविषयी सविस्तर माहिती मिळवली. तिसऱ्या सत्रात कृषी महाविद्यालय, नायगाव (खै.) येथे उपप्राचार्य नागेश घुबे, प्रा. भद्रे सर, देशमुख सर, जंगीलवाड मॅडम आदींसोबत चर्चा केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून रासायनिक व सेंद्रिय शेती यामध्ये समतोल साधण्याच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन घेतले.

चौथ्या सत्रात तुप्पा शिवारातील शेतकरी कचरू कदम, यशवंत कदम, सौ. पदमीनबाई, सौ. भारतबाई, सौ. उमाबाई आदींच्या शेतावर जाऊन "रासायनिक शेती : निसर्गासाठी एक हळुवार धोका" या विषयावर जनजागृती केली.

या प्रकल्पासाठी दत्तात्रय नारे सर व केशव पाटील सर यांनी माहिती संकलनात विशेष सहकार्य केले. मयूरच्या या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत असून त्याच्या पुढील प्रबंध व मौखिक परीक्षेसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# श्री ढोकेश्वर विद्यालयाला मिळाले, पोडियम लेक्चर स्टॅन्ड




**अहमदनगर :** (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर या विद्यालयाला पदवीधर मतदारसंघाचे आमदार मा. सत्यजित तांबे यांच्या स्थानिक विकास निधीतून रुपये 41 हजार रु. किंमतीचे "पोडियम लेक्चर स्टॅन्ड " भेट मिळाले. याबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, संस्थेचे जेष्ठ विश्वस्त आदरणीय सिताराम खिलारी, सर उर्फ अण्णा, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, डॉ. भाऊसाहेब खिलारी, विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षिका श्रीम. मनिषा गाडगे यांनी आ. तांबे यांचे आभार व्यक्त केले आहे. याप्रसंगी विद्यालयाच्या कला शाखेचे समन्वयक, श्री. विजय सोबले, शास्त्र समन्वयक, श्री. अशोक गांगड, ज्येष्ठ शिक्षक, श्री. मल्हारी वाघस्कर, श्रीम. निलम खिलारी, प्रा. भाऊसाहेब हिंगडे, श्री. रविंद्र मते, श्री. निलेश जासूद, श्री. बाबासाहेब जाधव, श्री. नारायण शेळके, श्री. अतुल सैद, श्री. संजय महांडुळे, विद्यालयातील सर्व सेवक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

# नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे किनवटमध्ये भव्य महा स्वच्छता अभियान

**बस स्थानक व उप जिल्हा रुग्णालयात स्वच्छतेचा संदेश | पोलिस निरीक्षक गणेश कराड यांची उपस्थिती**

**किनवट :** (समर्थ गांवकरी)




दि १ मार्च महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे रविवार, दिनांक १ मार्च २०२६ रोजी किनवट शहर व परिसरात भव्य महास्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. सकाळी ०७:३० वाजेपासून ते १०:३० वाजेपर्यंत तीन तास अविरत राबविल्या गेलेल्या या अभियानात प्रतिष्ठानचे असंख्य स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. किनवट पोलिस निरीक्षक गणेश कराड तसेच युवा नेते करण येंड्रलवार, नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, शिवसेना शहर प्रमुख प्रशांत कोरडे यांच्या उपस्थिती होती. दोन प्रमुख ठिकाणी स्वच्छता मोहीम : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान आणि किनवट नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने किनवट बस स्थानक आणि उप जिल्हा रुग्णालय, किनवट या दोन प्रमुख ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची ये-जा असल्याने तेथे स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक आहे. सदस्य स्वयंसेवकांनी या ठिकाणांची साफसफाई, कचरा संकलन आणि परिसर स्वच्छतेचे काम मोठ्या उत्साहाने पार पाडले. अभियानाचा उद्देश : जनमानसांत स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता वाढविणे, प्रशासकीय कार्यालये व वाहतूक मार्ग स्वच्छ ठेवणे, तसेच वृक्ष लागवडीद्वारे पर्यावरण संवर्धनास हातभार लावणे हे या अभियानाचे प्रमुख उद्देश आहेत. स्वयंप्रेरणा आणि सेवाभाव या मूल्यांवर आधारित हे अभियान दरवर्षी देशभरात यशस्वीपणे राबविले जाते. या उपक्रमामुळे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहोचतो.

वर्षानुवर्षांचा वारसा : गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरू असलेल्या या उपक्रमाची देशभरात ख्याती आहे. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड आणि पर्यावरण जागृतीचे विविध उपक्रम राबविले जातात. या कार्याला समाजाच्या सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो. प्रतिष्ठानच्या या समाजोपयोगी कार्याने किनवट शहरात एक वेगळीच ऊर्जा निर्माण केली आहे.

नागरिकांना आवाहन : नागरिकांनी अशा उपक्रमांत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. स्वच्छता ही केवळ एकट्याची जबाबदारी नसून ती संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केल्यास शहर स्वच्छ व सुंदर राहील, असा विश्वास प्रतिष्ठानने व्यक्त केला.

**अभियानाची ठळक वैशिष्ट्ये**

- तारीख व वेळ : रविवार, १ मार्च २०२६ | सकाळी ०७:३० ते १०:३०
- ठिकाण : किनवट बस स्थानक व उप जिल्हा रुग्णालय, किनवट
- आयोजक : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व किनवट नगरपालिका
- उपस्थिती : पोलिस निरीक्षक गणेश कराड व युवा नेते करण येंड्रलवार
- उद्दिष्ट : स्वच्छता जागृती, पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड "स्वच्छता हीच सेवा" | डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान

# श्री समर्थ मंडळाचे आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार वितरण समारंभ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



कुलोपाध्याय म्हणजे एक ज्ञानी,कर्तृत्वान महात्मा की जो आपल्यासाठी आणि दुसऱ्यासाठी देहत्याग करणारा व्यक्ती तो कुलोपाध्याय असतो त्या कुलाचे संपूण आयुष्य वृध्दीगंत कसे होईल यांच्यावरती प्रकाश टाकणारा एक थोर कुटुंबाचा महात्मा असतो. वेळावेळी कार्यक्रम, सोहळयात जो संकल्प सोडला जातो. कुलोपाध्याय हा वेळोवेळी कुटुंबाकरीता करत असलेल्या संकल्पातून दिसून येत असत कुलोपाध्यायच्या मनात त्या कुटुंबाकरीता किती अंत्यितक भाव असतो तो वेळावेळी आपल्याला त्या संकल्पातून दिसून येत असतो तो आनंद जसा त्या कुटुंबाला मिळत जातो तितकाच आनंद कुलोपाध्यायाला मिळत असतो. या माध्यमातून अश्या पुरोहितांचा सन्मान होत असून कै. सिध्देश्वर एकनाथ तथा सिदूकाका धर्माधिकारी घराण्याचा लौकीक वाढत आहे. असे प्रतिपादन ह.भ.प. निळकंठ देशमुख यांनी केले. श्री समर्थ मंडळ ऋग्वेद भवन अहिल्या नगर यांच्या वतीने व कै. सिध्देश्वर एकनाथ तथा सिदूकाका धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख हे होते. श्री समर्थ मंडळ यांच्या वतीने दिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार या वर्षी कल्पतरू मठाचे मठाधिपती वे.शा.सं विनायक धर्माधिकारी व वे.शा.सं. सागर कुलकर्णी ( घनपाठी ) यांना ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश अ.क्षीरसागर,सौ.धर्माधिकारी,सौ. कुलकर्णी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

वे.शा.सं विनायक धर्माधिकारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले परंपरा आणि कुलोपाध्याय हे जे नात आहे भारतीय संस्कृतीचे अभिन्य अंग आहे. या ज्या परंपरा आहेत कुलाचार कुलोपाध्याय ही संकल्पना पावत चालली आहे. यामुळे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होत आहेत आजच्या काळातही कुलोपाध्याय हे भारत सरकारमध्ये विशिष्ट पदावर आहेत लोपत पावत चालले कुलधर्म व कुलाचार जागवायचे असतील तर कुलपरंपरेचा सन्मान करायचा असेल तो कुलोपाध्याय सांगू शकतो तो तुमच्या अडीअडचणीत उभा राहू शकतो त्यांच्या मागे अध्यात्मिक बल असते असे शास्त्र सांगते ज्यांच्या नावाने हा सन्मान मिळत आहे त्यांचा हा कृपाशिर्वाद आहे म्हणून आम्ही तो ग्रहण करतोय. सौ. धर्माधिकारी आणि सौ. कुलकर्णी यांचा सत्कार सौ. बेदरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्तविक समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश अ. क्षीरसागर यांनी केले. दोन्ही पुरस्काथीचा परीचय समथ मंडळाचे विश्वस्त मिलिंद जोशी यांनी करून दिला. ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांचा परीचय समथ मंडळाचे खजिनदार पुरूषोत्तम बेदरे यांनी करून दिला.धर्माधिकारी परीवाराचे मनोगत हेमंत धर्माधिकारी यांनी पुरस्कारामागची भूमिका मांडली. कार्यक्रमास व मोठया संख्येने पुरोहित वर्ग व सभासद उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त दोन्ही गुरुजींनी आपले मनोगत व्यक्त केले. मानपत्र लेखन व वाचन ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.सूत्रसंचालन समथ मंडळाचे सचिव महेश रा . कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व कार्यकारणी सदस्यांनी खूप प्रयत्न केले. सौ. स्नेहल उपाध्ये यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. आभार समथ मंडळाचे विश्वस्त रविंद्र कुलकर्णी यांनी केले. खजिनदार पुरूषोत्तम बेदरे, कार्यकारिणी सदस्य रविंद्र कुलकर्णी, यशवंत आंबेकर, मिलिंद जोशी, माजी नगरसेवक भैय्या गंधे, वे. शा. सं. चकोर मुळे, बंडोपंत मुळे, रेखी गुरू,जोशी गुरू, प्रद्युम्न जोशी,सोमनाथ मुळे,ॲड अच्युतराव पिंगळे,धर्माधिकारी आणि कुलकर्णी परीवाराचे नातेवाईक तसेच मुकुल गंधे,अनंत कुलकर्णी,वाल्मीक कुलकणी,सौ. कालिंदी केसकर,रविंद्र धर्माधिकारी,उपेंद्र धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

# हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा बागडपट्टी विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांचे अध्यक्षतेखाली उपमहापौर ॲड.धनंजय जाधव यांचे हस्ते संपन्न झाले. स्नेहसंमेलन प्रसंगी इयत्ता चौथी मधील कु.अर्णवी कांबळे व कु. गायत्री गायकवाड यांनी उपमुख्यकार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ व उपमहापौर ॲड.धनंजय जाधव यांची मुलाखत घेत अहिल्यानगर शहरा बाबत त्यांचे व्हिजन जाणून घेतले.स्वच्छ व ग्रीन सीटी असे व्हिजन घेऊन भविष्य काळात काम होईल. असे उपमहापौर धनंजय जाधव यांनी सांगितले.याप्रसंगी शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी सन २०२५-२६ चा शैक्षणिक अहवाल सादर केला.तर संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांनी विदयार्थ्यांच्या कलागुनांना वाव देणारी शाळा म्हणून गौरवोद्गार काढले. बालवाडी पासून चौथी पर्यंतच्या ३०० विदयार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमात सहभागी होत ऑपरेशन सिंदूर, बळीराजाची व्यथा,शेतकरी नृत्य,देशभक्ती पर गिते, लाकनृत्य सादर केली.

# पारनेर येथे शिवसेना पदाधिकारी निवडी जाहीर



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांच्या निवडीची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. या निवडीत पारनेर तालुका शेतकरी संघटनाच्या तालुका प्रमुखपदी श्री. महेंद्र पांढरकर यांची निवड करण्यात आली. तालुका उपप्रमुखपदी श्री. राजेंद्र सर्जेराव रोकडे तर तालुका संघटकपदी श्री. शिवाजी कारभारी शिंगोटे यांची नियुक्ती झाली.

याशिवाय, जवळा गावातील श्रीमती सुनीता सतीश पठारे यांची पारनेरकर स्थित मुंबई महिला संघटक पदावर निवड झाली आहे. या निवडीमुळे तालुक्यातील शेतकरी, महिला आणि संघटनेतील कार्यकर्त्यांना नवीन जबाबदाऱ्या मिळाल्या असून, पक्षाच्या स्थानिक पातळीवरील कामाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

निवड प्रक्रियेला तालुका प्रमुख अरुणराव ठाणगे, जिल्हा ओबीसी सेल प्रमुख खंडुजी भुकन साहेब, तालुका महिला प्रमुख कोमलताई भंडारी, जिल्हा संघटक संदीप कपाळे, रविंद्र पाडळकर, सुभाष वराळ, बाळासाहेब नगरे, संतोष भंडारी, भीमा औटी, कर्ण रोकडे, योगेश रोकडे, संदीप खंडागळे, नवनाथ विचारे, माऊली गायकवाड, अशोक गजानन सोमवंशी, प्रशांत रासकर, चंद्रकांत कुलकर्णी, कैलास नऱ्हे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात सर्वांनी एकत्र येऊन पक्षाच्या भविष्यासाठी संकल्प व्यक्त केला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शेतकरी, महिला आणि युवकांच्या हितासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. पारनेर तालुक्यात शिवसेनेची संघटना अधिक मजबूत होण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरली आहे.

# महासमन्वयक पदी प्रल्हाद सोनवणे

**रावेर : (समर्थ गांवकरी)**



जळगाव जिल्हातील कोळी समाजाचे झुंझार नेते प्रल्हाद भाऊ सोनवणे यांची देवाभाऊ फाऊंडेशन जळगाव लोकसभा सहसमन्वयक पदी नियुक्ती ऑटो रिक्षा चालकांचे अध्यक्ष तथा कोळी समाजाचे नेते प्रल्हाद सोनवणे यांची देवाभाऊ फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या संघटनेत मुख्य समन्वयक श्री गजाननराव जोशी यांनी जळगाव लोकसभा सहसमन्वयक पदी नियुक्ती केली प्रल्हाद सोनवणे आदिवासी कोळी महासंघ ऑटो रिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समिती नेताजी सुभाषचंद्र बोस रिक्षा युनियन जळगाव जिल्हा भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन यांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करीत आहे.

# सिंधुदुर्ग किल्ला संवर्धनासाठी 'आपला मावळा' चा पुढाकार

- ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी सामूहिक जबाबदारीची खासदार नीलेश लंके यांची हाक

**सिंधुदुर्ग : (समर्थ गांवकरी)**



अरबी समुद्राच्या लाटांवर अभिमानाने उभा असलेला आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणारा सिंधुदुर्ग किल्ला आजही दुर्लक्षित अवस्थेत असल्याची खंत खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली. ऐतिहासिक वारशाचे जतन करणे ही केवळ शासनाची नव्हे, तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार लंके यांच्या पुढाकारातून वर्षभरापूर्वी सुरू करण्यात आलेल्या 'आपला मावळा' या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून किल्ल्यावर रविवार दि. १ मार्च रोजी गड संवर्धन, स्वच्छता आणि वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. शेकडो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत किल्ला परिसर स्वच्छ करण्याचे काम हाती घेतले. यावेळी शिवराजे देवस्थानचे अध्यक्ष सयाजी सपकाळ, मालवणचे उपनगराध्यक्ष राजन वराडकर, आपला मावळा चे अध्यक्ष रामेश्वर निमसे, आपला मावळाचे सचिव सीताराम काकडे व आपला मावळा संघटनेचे हजारो मावळे उपस्थित होते. गडावरील प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या, थर्माकोल व अन्य अपायकारक साहित्य संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. पर्यटकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी सूचना फलक लावण्यात आले. डस्टबिन आणि बाकड्यांची व्यवस्था करण्यात आली. पायवाटा मोकळ्या करून गडाच्या संरचनेला बाधा पोहोचणार नाही, याची दक्षता घेण्यात आली.

या वेळी बोलताना खासदार लंके म्हणाले, "शिवरायांचे गड हे आपल्या इतिहासाचे जिवंत प्रतीक आहेत. सिंधुदुर्गसारखा सागरी किल्ला हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा मानबिंदू आहे. या गडांची होत असलेली उपेक्षा वेदनादायी आहे. सरकार, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येऊन या वारशाचे संरक्षण केले पाहिजे. 'आपला मावळा'च्या माध्यमातून गडसंवर्धनाचा हा लढा पुढेही सुरूच राहील." या मोहिमेद्वारे युवा पिढीत इतिहासाविषयी अभिमान आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित स्वयंसेवकांनी भविष्यातही अशाच संवर्धन मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला. इतिहासाचे जतन ही केवळ भावनिक नव्हे, तर सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असल्याचा ठाम संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# संपुर्ण जव्हार शहरात स्वच्छता अभियान मोहिम यशस्वी

**पालघर : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र भूषण तीर्थ डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, ता. आलिबाग, जि. रायगड यांच्या वतीने रविवारी (दि. १ मार्च) जव्हार शहरात व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ७ ते ११.३० या कालावधीत पार पडलेल्या या मोहिमेत सुमारे ३५२ श्री सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शहरातील प्रमुख शासकीय कार्यालये, रस्ते व सार्वजनिक स्थळांची स्वच्छता केली.

आदरणीय तीर्थरूप डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. विक्रमगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री हरिश्चंद्र भोयेसाहेब यांनी अभियानस्थळी उपस्थित राहून स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतः खराटा हाती घेत श्रमदानात सहभाग घेतला. तसेच जव्हार नगर परिषदेचे माजी सभापती श्री गणेश राजपूतसाहेब यांनीही मोहिमेस सहकार्य केले.

विजयस्तंभ ते सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, जिल्हा आरोग्य कार्यालय, भारतरत्न राजीव गांधी स्टेडियम परिसर, नगरपालिका शाळा, पोलीस अधीक्षक कार्यालय, तहसील व पंचायत समिती कार्यालय, हनुमान पॉईंट, सूर्यातलाव, श्री राम मंदिर, खंडेराव मंदिर, महालक्ष्मी मंदिर, जिमखाना परिसर, एस.टी. स्थानक, विविध बँका, सार्वजनिक वाचनालय, वन विभाग कार्यालय, नगर परिषद कार्यालय, आदिवासी भवन, पोलीस ठाणे, पोस्ट कार्यालय, पतंगशहा कुटीर रुग्णालय आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली.

या मोहिमेत २ ट्रॅक्टर, ६ कचरा गाड्या, २५४ झाडू, २० घमेली, ३१ कोयते, ३२ पंजे, १६ फावडी, २४ विळे तसेच ४५० मास्क व ४१० जोड्या हातमोज्यांचा वापर करण्यात आला. सुमारे ५०,०२५ चौरस मीटर क्षेत्र स्वच्छ करण्यात आले. १०.९०० टन सुका कचरा व १ टन ओला कचरा संकलित करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. ओला कचरा वाहतुकीसाठी ट्रॅक्टरच्या २६ फेऱ्या करण्यात आल्या.

नगर परिषद, जव्हार यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या मोहिमेमुळे शहरातील प्रमुख भाग स्वच्छ झाले असून नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे. केवळ प्रतीकात्मक कार्यक्रम न ठेवता प्रत्यक्ष श्रमदानातून स्वच्छता राबविण्यात आल्याने उपक्रमाची शहरभर चर्चा सुरू आहे.

# १५३ भाविकांनी केले रक्तदान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे.रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे.असे प्रतिपादन संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम धवल पुरी अहिल्या नगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे सदस्य मोहनदास (नागपूर) यांनी केले आहे. सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत गरीब दास जी महाराज यांचा ३०० व्या बोध दिवसानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात १५३ भाविकांनी रक्तदान केले. सत लोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. याप्रसंगी संत रामपाल जी महाराज सेवा कमिटीचे मोहनदास (नागपूर), भगवानदास (पुणे), रमेशदास (नाशिक) उत्तम दास (अहिल्या नगर), सूरज दास (मुंबई) तसेच जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ.प्रसाद विटकर डॉ. विलास मढीकर,जनसंपर्क अधिकारी, शंकर खंडागळे, मेघा शिंदे,गौरव बागल,पानगावकर, किशोर यादव आदी उपस्थित होते.

# साहित्यिकांनी प्रतिभेचा वापर समाजासाठी करावा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



"साहित्यिकांनी गटतटाचे राजकारण वगळून साहित्याशी प्रामाणिक राहून कार्यरत राहावे, सामाजिक प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर लेखन करावे आणि आपल्या प्रतिभेचा वापर समाजहितासाठी करावा", असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ.सुरेश पानसरे यांनी केले. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या राहाता तालुका शाखा कार्यकारी मंडळाच्या निवड प्रसंगी लोणी येथील संकल्प मंगल कार्यालयात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. सोपानराव विखे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, नियोजन समिती प्रमुख बबनराव गिरी व शर्मिला गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत राहाता, शिर्डी व लोणी परिसरातील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत राहाता तालुका शाखेच्या अध्यक्षपदी साहेबराव तुपे, सचिवपदी सुमेध ब्राह्मणे यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी प्रा.डॉ.संदीप तपासे, उपाध्यक्षपदी सुयश वाघमारे, खजिनदारपदी विजय तांबे यांची निवड झाली. मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. सोपानराव विखे, भास्कर दादा लगड, संतोष ब्राह्मणे, भास्करराव निर्मळ तसेच कॉ.सुरेश पानसरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी साहेबराव तुपे यांनी नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच शिर्डी येथे तालुकास्तरीय काव्य संमेलन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली. प्रा.सोपानराव विखे म्हणाले की, कोणत्याही सोयी-सुविधा नसताना शब्दगंधने गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने विविध उपक्रम राबवले आहेत. या कार्यातून अनेक नवोदित लेखक घडले असून ही चळवळ विस्तारत असल्याचे पाहून समाधान वाटते. शब्दगंधच्या विविध उपक्रमांची माहिती सुनील गोसावी यांनी दिली, तर सुमेध ब्राह्मणे यांनी आभार प्रदर्शन केले. नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, राज्य संघटक प्रा.डॉ.अशोक कानडे, प्रा. डॉ. रमेश वाघमारे यांनी विशेष अभिनंदन केले.

# माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना निमंत्रण



**छत्रपती संभाजी नगर : (समर्थ गांवकरी)**

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीच्या वतीने 18 मार्च 2026 रोजी वेरूळ येथे साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण सोमवारी (दि २) राजस्थानचे राज्यपाल महामहीम हरीभाऊ बागडे नाना यांना छत्रपती संभाजी नगर येथे निमंत्रण देण्यात आले. तर माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना निमंत्रण देण्यात आले. यावेळी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर भाऊ चव्हाण, स्वराज्य संकल्पक जयंती महोत्सव समिती अध्यक्ष डॉ विलास पांगारकर, विजय काकडे पाटील, परमेश्वर नलावडे पाटील, पत्रकार अमोल सोनवणे, मच्छिंद्र घोरपडे, राहुल बागुल आदी उपस्थित होते.

# उधारीच्या आमदारकीवर जगू नका, ताकद असेल तर राजीनामा देऊन पुन्हा निवडून या

- सुजित झावरे पाटलांचे आ. काशिनाथ दातेंना खुले आव्हान
- पारनेर नगरपंचायतमध्ये सत्कार समारंभ तसेच पत्रकार परिषदेचे आयोजन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



ज्याने काम केले, त्याचे श्रेय त्याला मिळालेच पाहिजे. ज्यांना सात-आठ वर्षांत जमले नाही, ते काम आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून करून आणले. आमदार काशिनाथ दाते यांनी उधारीच्या आमदारकीवर जगू नये; ताकद असेल तर आमदारकीचा राजीनामा द्या आणि पुन्हा निवडणूक लढवून दाखवा, अशा कडक शब्दांत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी आमदार काशिनाथ दाते यांचे नाव न घेता त्यांच्यावर तोफ डागली. पारनेर नगरपंचायतीच्या वतीने नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या उपस्थितीत सुजित झावरे पाटील यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके, नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे, शिवसेना तालुकाप्रमुख अरुणराव ठाणगे, ज्येष्ठ नेते खंडू भुकण, डॉ. बाळासाहेब कावरे, निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर, रवींद्र गायखे, शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख डॉ. कोमल भंडारी, योगेश मते, भूषण शेलार, आदी उपस्थित होते.

पारनेरच्या विकास आराखड्याला (DPR) मंजुरी मिळवून दिल्याबद्दल हा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना झावरे पाटील यांनी तालुक्यातील श्रेयवादाच्या लढाईवर सडेतोड भाष्य केले.

झावरे पाटील म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेरमधील प्रवेश सोहळ्यात डीपीआर मंजुरीचे आश्वासन दिले होते. आचारसंहितेमुळे या कामाला विलंब झाला, मात्र पाठपुरावा करून मी ही फाईल मार्गी लावली. मी सोशल मीडियावर पीडीएफ टाकली तर आमदारांच्या पोटात गोळा आला. त्यांना डीपीआर मंजूर झाल्याचा आनंद नाही, तर तो सुजित झावरे यांनी मंजूर केला याचे दुःख आहे. ज्यांना साधे ग्रामपंचायत सदस्य होण्याची लायकी नाही, त्यांना अजित पवार आणि सुजय विखे यांच्या सांगण्यावरून आम्ही मदत केली आणि आमदार केले. आज तेच उपकाराची भाषा विसरले आहेत, अशी घणाघाती टीका त्यांनी केली. पारनेर शहराच्या पाणी योजनेबाबत बोलताना सुजित झावरे पुढे म्हणाले की, विकास आराखडा मंजूर नसल्याने पाणी योजनेत तांत्रिक अडचणी येत होत्या.

आता तो मार्ग मोकळा झाला आहे. येत्या काळात मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांच्या माध्यमातून पारनेरकरांच्या सेवेत ही पाणी योजना कार्यान्वित करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार दाते यांचा उल्लेख 'गोड बोलणारा पण मनात विष असलेला माणूस' असा करत झावरे पाटील यांनी संताप व्यक्त केला . निवडणुकीच्या काळात ग्रामपंचायत सदस्य नसलेल्या माझ्या पाया पडायला हे येत होते. विधानसभा निवडणुकीत ज्यांच्याकडे १०-१५ गावांत बुथ लावायला माणसे नव्हती, त्यांची व्यवस्था आम्ही केली. आम्ही एका विषारी झाडाला पाणी घातले, याची आज खंत वाटते,असेही ते म्हणाले.

यावेळी त्यांनी माजी नगराध्यक्ष अशोक चेडे यांच्यावरही टीका केली. चेडे यांना डीपीआरचा लॉंग फॉर्म तरी माहिती आहे का? कोरोना काळात चढ्या भावाने माल विकणाऱ्या वृत्तीचा वापर करून आमदार आपली पोळी भाजून घेत आहेत. येणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत जनताच त्यांना चोख उत्तर देईल, असे शिवसेना नेते सुजित झावरे यांनी ठणकावून सांगितले. माजी आमदार विजय औटी यांनी कधीही खालच्या पातळीवर टीका केली नाही दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेतले नाही असेही झावरे बोलताना यावेळी म्हणाले आहेत.

# एकता महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

- "विज्ञान म्हणजे विचारांची मुक्त उड्डाणे" - ठाकूर

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)



सावेडी उपनगरातील तपोवन रोड येथील एकता महाविद्यालयात २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे थोर वैज्ञानिक चंद्रशेखर व्यंकट रमण यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी लावलेल्या ' रमण इफेक्ट' या महत्त्वपूर्ण शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. कार्यक्रमाच्या प्रारंभी सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व विज्ञान क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची उजळणी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून व्याख्यात्या ऋता ठाकूर उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे होते. व्यासपीठावर सायन्स विभाग प्रमुख प्रा. आकांक्षा गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज क्षीरसागर, दिपाली गिरी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्या ऋता ठाकूर यांनी आपल्या भाषणात विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले. त्या म्हणाल्या की, विज्ञान हे केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित नसून आपल्या प्रत्येक कृतीत आणि निर्णयात विज्ञान दडलेले आहे. आपण मोबाईल वापरण्यापासून ते आरोग्याची काळजी घेण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर विज्ञानाचा आधार घेतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे विषय म्हणून नव्हे, तर जीवनपद्धती म्हणून पाहावे. संशोधनाची वृत्ती, जिज्ञासा आणि नव्या कल्पनांना स्वीकारण्याची तयारी हीच विज्ञानाची खरी ओळख असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना संशोधनाचा दृष्टिकोन ठेवून प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक नजरेने पाहण्याचे आवाहन केले. विज्ञानामुळे विचारशक्ती, निरीक्षण क्षमता आणि तर्कशुद्ध निर्णय घेण्याची सवय विकसित होते, असे त्यांनी नमूद केले. अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या समजुती दूर करण्यासाठी विज्ञानाचा आधार आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी तरुण पिढीने प्रयोगशीलता व नवनिर्मितीची कास धरावी, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विज्ञान विषयक पोस्टर स्पर्धा तसेच विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित आकर्षक पोस्टर्स सादर करत विज्ञानातील विविध शोध, पर्यावरणीय समस्या, अंतराळ संशोधन आणि तंत्रज्ञानातील प्रगती यांचे प्रभावी सादरीकरण केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले ज्ञान आणि तयारीचे दर्शन घडवले. अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे यांनी विज्ञानाच्या प्रसारासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील राहील, असे सांगितले. विज्ञान दिनासारखे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवतात आणि संशोधनाची प्रेरणा देतात, असे ते म्हणाले.कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाणीव अधिक दृढ झाली असून संपूर्ण वातावरण विज्ञानमय आणि उत्साहपूर्ण झाले होते.

# कवितेमुळे माणूस समृद्ध होतो - कवी यशवंत पुलाटे

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)



मानवी मनाच्या भावसंवेदना कमीत कमी शब्दांत व्यक्त करून त्या श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी साधन म्हणजे कविता. कवितेच्या निमित्ताने जमलेला गोतावळा हा भावबंध दृढ करणारा असतो. कवितेमुळे माणूस समृद्ध होतो, असे प्रतिपादन कवी यशवंत पुलाटे यांनी केले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व सिंधूताई विखे पाटील सार्वजनिक वाचनालय, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभाग यांच्या सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत आयोजित अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५ मधील काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या विचारपीठावर माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कवी भास्कर लगड, शब्दगंध चे संस्थापक सचिव सुनील गोसावी तसेच सहाय्यक ग्रंथालय संचालक सचिन जोपळे आदी मान्यवर उपस्थित होते. शर्मिला गोसावी यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. या काव्यसंमेलनात प्रा. डॉ. संदीप तपासे,भास्कर निर्मळ, प्रा. दादासाहेब कोते, बबनराव गिरी, संजय सुबे, वैष्णवी निर्मळ, मराठी स्वाक्षरी मोहिमेचे पुढाकार घेणारे विक्रम चव्हाण, एकनाथ औटी, प्रमोद येवले, बाळासाहेब धावणे, पोपटराव दातार, विजय डोळे आणि साहेबराव तुपे यांनी आपल्या विविधांगी काव्यरचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

सुनील गोसावी, भास्कर लगड यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी पार्वतीबाई गोसावी सार्वजनिक वाचनालय चे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ गोसावी, प्राचार्य डॉ. पवार, मीरा काकडे, बाबासाहेब सांबारे, अमोल इथापे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांच्या भावना भडकवून राजकीय खेळी करु नका

- आमदार काशिनाथ दाते सर
- ५ मार्चपर्यंत कुकडीचे आवर्तन सुटणार

**पारनेर :** (समर्थ गांवकरी)



> येडगाव धरणातील अपेक्षित पाणीसाठा, तांत्रिक बाबी आणि सर्व लाभक्षेत्रांचा विचार करूनच आवर्तनाचे नियोजन केले जाते. दोन-तीन दिवसांचा विलंब तांत्रिक कारणास्तव होऊ शकतो; मात्र ५ मार्चपर्यंत पाणी निश्चितपणे उपलब्ध होईल, यावर कोणीही राजकारण करू नका.
> **आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा डावा कालव्याच्या आवर्तनाबाबत काही घटकांकडून जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून शेतकऱ्यांच्या भावनांना चिथावणी देण्याचा प्रयत्न सुरू असल्याची खंत व्यक्त करत आमदार काशिनाथ दाते सर यांनी शेतकरी बांधवांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या पाण्याच्या प्रश्नाला राजकीय रंग देत स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा डाव उधळून लावा, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आमदार दाते सर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन कुकडी व पिंपळगाव जोगा कालव्याचे आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्या- नंतर मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेबांमार्फत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून कुकडी कालव्याद्वारे ५ मार्च दरम्यान तर २५ फेब्रुवारी ते १ मार्च च्या दरम्यान पिंपळगाव कालव्यांद्वारे पाणी सोडण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही वेळेत आवर्तन सोडण्यात आले असल्याचे नमूद करत त्यांनी शेतकऱ्यांनी अफवांना बळी न पडता प्रशासनावर विश्वास ठेवावा, असे आवाहन केले. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून कोणत्याही परिस्थितीत त्यांना न्याय मिळवून देण्याची आपली बांधिलकी कायम राहील, अशी ग्वाहीही आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

# "अस्मिता महिला लीग" आयोजनात सहभागी होण्याचे आवाहन


**नांदेड :** (समर्थ गांवकरी)

भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांचेकडून प्राप्त पत्रानुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त "अस्मिता महिला लीग" आयोजनासंबंधी मानक कार्यपद्धती निर्गमित करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने नांदेड जिल्हयामध्ये भारतीय क्रीडा प्राधिकरण, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, खेलो इंडिया, माय भारत, युवा कार्य, क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विदयमाने व सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या सहकार्याने 8 मार्च, 2026 रोजी"अस्मिता महिला लीग" स्पर्धाचे आयोजन सायन्स कॉलेज, नांदेड करण्यात आले आहे. या स्पर्धेचा मुख्य उददेश म्हणजे महिला खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

# दर्शन घेऊन परततांना चारचाकी वाहनाला रोह्याची धडक १ जखमी

*अपघातात अहिल्यानगर मनपाचे शेखर देशपांडे जखमी : मा. आ. संजय रायमुलकर धावले मदतीला*

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)



संत गजानन महाराज यांचे दर्शन घेऊन परत येत असताना ईर्टिगा कारचा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. आज दुपारी सुमारे ३.४५ ते ४.०० वाजण्याच्या सुमारास वरवंड गावाजवळ हा अपघात झाला. या अपघातात एक प्रवासी जखमी झाला असून रस्त्यावर अचानक कारवर रोही आल्याने रोही देखील गंभीर जखमी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १६ डी डब्ल्यू ८८१० क्रमांकाची ईर्टिगा कार (अहिल्यानगर) येथून आठ जणांचं कुटुंब संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगाव येथे आले होते. दर्शन घेऊन परत जात असताना वरवंड गावाजवळ अचानक एक रोही ईर्टिगा कारवर आल्याने चालकाचा ताबा सुटला आणि हा अपघात झाला रोही देखील जखमी झाली.

या अपघातात कारमधील प्रवासी शेखर देशपांडे (अहिल्यानगर) हे जखमी झाले. त्यांना ग्रामीण रुग्णालयाच्या ॲम्बुलन्सद्वारे तात्काळ जानेफळ येथील श्री गजानन रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. दरम्यान, देऊळगाव साकर्शा येथून मेहकरकडे जात असताना मेहकरचे माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या वाहनासमोर हा अपघात घडल्याचे दिसून आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती देत जखमींना मदत केली तसेच वन विभागाशी संपर्क साधला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. व या अपघातात जखमींना रुग्णालयात पाठविण्यात आले.

# पडघ्यात शिक्षकांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकाराने जिल्हा परिषद मराठी शाळेत कार्यक्रम; मान्यवरांची उपस्थिती

**भिवंडी :** (समर्थ गांवकरी)



मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र नवनिर्माण सेना पडघा व पडघा परिसर यांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघा येथे मराठी शिक्षकांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मराठी भाषा जपणे व तिच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांचे कार्य गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला शाळेच्या माजी मुख्याध्यापिका ललिता अशोक कराडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. मराठी ही केवळ भाषा नसून आपल्या संस्कृतीची ओळख आहे. विद्यार्थ्यांमध्ये भाषेची आवड निर्माण करण्याचे कार्य शिक्षक सातत्याने करत असतात,

असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, तालुकाध्यक्ष विकास जाधव, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष शशिकांत कथोरे, तालुका उपाध्यक्ष गुरुनाथ मते, भिवंडी संघटक नरेश शेलार, पडघा विभाग अध्यक्ष प्रताप विशे व सदानंद गोरले, पडघा शहर अध्यक्ष मनोज मराठा, उपविभाग अध्यक्ष आदित्य पाटील, पडघा उपशहर अध्यक्ष चंद्रकांत कदम तसेच अविनाश जाधव, सिद्धार्थ कांबळे आणि विद्यार्थी सेनेचे रितेश शेट्टी यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.मराठी राजभाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, काव्यवाचन, भाषणे आणि नाट्यप्रयोग अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या शेवटी मराठी विषयात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमानाची भावना अधिक दृढ झाली असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# कामकाजाच्या वेळा निश्चित

**नांदेड :** (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील पशुपालकांना सकाळच्या सत्रात पशुवैद्यकीय सेवा सुलभ व्हावी तसेच कार्यक्षेत्रातील गावांना नियमित भेटी देऊन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविता याव्यात, या उद्देशाने राज्यातील जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालये, तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालये, पशुवैद्यकीय दवाखाने व फिरते पशुवैद्यकीय दवाखाने यांच्या कामकाजाच्या वेळांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि. 28 फेब्रुवारी 2026 च्या शासन निर्णयानुसार दि. 1 मार्च 2026 पासून पुढील सुधारित वेळा लागू करण्यात आल्या आहेत.

# सभासदाला मदतीचा हात - वसंत कवाद



**पारनेर :** (समर्थ गांवकरी)

बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे सभासद स्वर्गीय.वंदना कैलास घोडे राहणार टाकळी हाजी यांचा मोटार सायकल वरती प्रवास करत असताना पाबळ येथे त्यांचा अपघात झाला. पतसंस्थेने सर्व सभासदाचा युनाईटेड इंडीया इन्सुरन्स विमा कंपनी यांचे कड़ुन १ लाख रुपये पर्यंत चा अपघाती विमा उतरविलेला असून त्या माध्यमातून स्वर्गीय वंदना घोडे यांचा युनाईटेड इंडीया इन्सुरन्स विमा कंपनी यांचेकडून संस्थेने विमा मंजुर करून त्यांचे वारसदार दत्तात्रय कैलास घोडे यांना १ लाख रुपयांचा धनादेश संस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर, व्हा.चेअरमन नामदेव मामा थोरात यांचे हस्ते देण्यात आला . कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे सभासद स्वर्गीय.वंदना कैलास घोडे राहणार टाकळी हाजी यांचा मोटार सायकल वरती प्रवास करत असताना पाबळ येथे त्यांचा अपघात झाला. पतसंस्थेने सर्व सभासदाचा युनाईटेड इंडीया इन्सुरन्स विमा कंपनी यांचे कड़ुन १ लाख रुपये पर्यंत चा अपघाती विमा उतरविलेला असून त्या माध्यमातून स्वर्गीय वंदना घोडे यांचा युनाईटेड इंडीया इन्सुरन्स विमा कंपनी यांचेकडून संस्थेने विमा मंजुर करून त्यांचे वारसदार दत्तात्रय कैलास घोडे यांना १ लाख रुपयांचा धनादेश संस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर, व्हा.चेअरमन नामदेव मामा थोरात यांचे हस्ते देण्यात आला.

यावेळी संस्थेचे संचालक चंद्रकांत लामखडे बाळासाहेब लामखडे श्री. दामूशेठ लंके, भिवाशेठ रसाळ, शांताराम कळसकर, अभिजीत मासळकर बाबाजी कळसकर, सतीष साळवे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके उपव्यवस्थापक शांताराम सुरकुंडे, जनरल मॅनेजर संपत ठुबे शाखाधिकारी चंद्रकांत लंके आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# जलसिंचनाला नवी गती; आमदार काशिनाथ दातेंच्या पाठपुराव्याला यश

**पारनेर :** (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द उपसा सिंचन योजना तसेच वनकुटे आणि पिंपळगाव रोठा उपसा सिंचन योजनेच्या संदर्भातील महत्त्वाचा कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्याची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली. जलसिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी सातत्याने आणि प्रभावीपणे केलेल्या पाठपुराव्यामुळेच ही प्रक्रिया पूर्णत्वास गेल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सबंधित मांडवे खुर्द उपसा सिंचन योजना तसेच वनकुटे आणि पिंपळगाव रोठा उपसा सिंचन योजणांचे सविस्तर सर्वक्षण करण्याच्या कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन अंदाजे २८ लाख ५६ हजार ६६५ रुपयांच्या रकमेचा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. संबंधित ठेकेदारास काम निश्चित कालावधीत, दर्जेदार व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. आवश्यक त्या सर्व प्रशासकीय व तांत्रिक बाबींची पूर्तता करूनच हा आदेश जारी करण्यात आला असल्याचेही आमदार दाते यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नाला प्राधान्य देणे ही केवळ घोषणा नसून आपली बांधिलकी आहे, असे ठामपणे सांगत आमदार दाते सरांनी सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी वर्गाला न्याय देण्याची आपली भूमिका पुन्हा अधोरेखित केली. शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे, पाण्याअभावी होणारे नुकसान थांबवणे आणि ग्रामीण अर्थचक्राला बळकटी देणे हा या योजनांमागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

# विज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करून विकसित भारत घडवा - डॉ. शुभांगी मोहरेकर

## डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेज मधे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)



प्रत्येक भारतीयाने विज्ञानाची कास धरली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधक वृत्ती विकसित व्हावी, विज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करून विकसित भारत घडवा.असे आवाहन न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ.शुभांगी मोहरेकर यांनी केले. वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन.जे. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी येथे दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी "Women in Science: Catalyzing Viksit Bharat" या राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या २०२६ च्या थीमअंतर्गत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग व फार्म केमिस्ट्री विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. शुभांगी मोहरेकर (M.Sc., Ph.D. जपान) संस्थेचे सचिव श्री. रामकिसन देशमुख, खजिनदार श्री.दादासाहेब भोईटे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने झाली. यानंतर विज्ञान क्षेत्रातील महान शास्त्रज्ञांना अभिवादन करण्यात आले. विज्ञान विशेष लेखाचे वाचन प्राचार्य डॉ.श्याम पंगा यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात महिलांचे विज्ञान क्षेत्रातील योगदान, संशोधनातील संधी आणि विकसित भारत घडविण्यातील त्यांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. डॉ.मोहरेकर यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन करताना पुढे म्हटले विज्ञानामुळे मानवी जीवन कसे सुसह्य झाले त्याचे उदाहरणे देत विज्ञानामधील गुंतागुंतीच्या संकल्पना सोप्या पद्धतीने सांगितल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग, प्रात्यक्षिके सादर केले. यामध्ये सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमासाठी प्राचार्या अनुराधा चव्हाण, प्राचार्य डॉ.वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ.प्रसाद घुगरकर, सौ.स्वाती कडनोर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डी.फार्म विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित विविध विषयांवर आकर्षक मॉडेल्स सादर केली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून वैज्ञानिक दृष्टीकोन, सर्जनशीलता आणि संशोधनाबद्दलची आवड प्रकर्षाने दिसून आली. डी.फार्म व बी.फार्म विद्यार्थिनींनी महाविद्यालयीन गीतावर नृत्य सादर केले तसेच विज्ञानाच्या सामाजिक योगदानावर आधारित पोवाडा व लेझीम नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. सांस्कृतिक गीत सादरीकरणानंतर कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरा

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर येथील एज्युव्हीजन शाळेत प्रथमच विशेष मुलांसोबत रंगोत्सवाचे आयोजन दि.२ सोमवारी रोजी करण्यात आले होते. रंगोत्सवात शहरातील वंचित घटकांना सामावून घेत हा उत्सव साजरा करण्यात आला.या उपक्रमाला चिमुकल्यांनी उस्फुर्त प्रतिसाद देत रंगाची मुक्तहस्ताने उधळण केली.आवघा रंग एकचि झाला, रंगी रंगले चिमुकले असे चित्र निर्माण झाले होते. शहरासह तालुक्यातील होलीकेचे दहन करून रंगवलेल्या सुरुवात झाली. एजुव्हीजन इंग्लिश स्कूलच्या पुढाकाराने समाजातील वंचित घटक, भटकंती करून पालात आयुष्य व्यतीत करणाऱ्या कुटुंबांतील चिमुकल्या आमंत्रित करण्यात आले होते.या शाळेच्या पटांगणात रंगोत्सवाचे आयोजन



करण्यात आले होते . यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार सुर्यकांत ताडेवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू कराळे. , शंकर आप्पा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष अभिषेक गुरखेल, भाजप अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश चिटणीस रामराव भालेराव,. भाजप जिल्हाउपाध्यक्ष नागोराव भांगे,पुन्यजागर शैक्षणिक प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष गुणवंत वीरकर ,संदिप राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उत्सवाच्या प्रारंभ सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तसेच प्रमुख पाहुण्यांचे हास्ते होलीकेचे पुजन करून दहन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या वाईट सवयी एक कागदावर लिहून त्यांचे दहन केले.व चांगल्या गोष्टी आत्मसात करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण रावते यांनी केले. भारतीय सन , उत्सवा निसर्गासी निगडीत आहेत. या उत्सवाच्या मागे एक संदेश असतो होलीकेचे दहन म्हणजे आपल्यातील वाईट विचारांचे दहन करणे आहे.समाजात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वाईट विचारांचे दहन करणे आवश्यक आहे. विद्यर्थ्यांनी वाईट सवयींचा त्याग करावा असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू कराळे यांनी केले.तर रंगोत्सव साजरा करतांना नैसर्गिक रंगाचा वापर करून कोणालाही इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.पळसांच्या फुलांपासून तयार करण्यात आलेल्या रंगामुळे शहरातील उष्णता कमी होण्यासाठी मदत होते.समाजातील विविध घटकांना सामावून घेत रंगोत्सव साजरा करणे हा एक चांगला उपक्रम आहे आसे मत नायब तहसीलदार सुर्यकांत ताडेवाड यांनी व्यक्त केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रिया रावते, रेखा रावते, रोहिणी शिंदे,कोमल डांगे,स्वाती कवडे,स्वाती पांचाळ, शिवराणी पत्रे, किरण क्षीरसागर, अल्का धुमाळ, ममता हट्टेकर,बी विजयकृष्णा, मनीषा सिंग, शांतून सिंग, दत्ता उपरे, आशुतोष पुरी सेविका अर्चना रसवंते,कविता गाडेकर,विजय पवार यांनी पुढाकार घेतला.

# मॅक्लेओड्स फार्मास्युटिकल्समध्ये निवड

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

औषधनिर्माण (फार्मसी) क्षेत्रातील वाढती मागणी आणि उद्योगक्षेत्राशी सुसंगत शिक्षण यांची प्रभावी सांगड घालत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने रोजगारनिर्मितीच्या दिशेने आणखी एक उल्लेखनीय पाऊल टाकले आहे. विद्यापीठाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग आणि औषधनिर्माणशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये औषधनिर्मिती क्षेत्रातील नामांकित कंपनी मॅक्लेओड्स फार्मास्युटिकल्सने २० विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली.

हा यशस्वी उपक्रम कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. बी.फार्म आणि एम.फार्म अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी ही विशेष भरती प्रक्रिया आयोजित



करण्यात आली होती. दिवसभर चाललेल्या मुलाखतीनंतर पात्र ठरलेल्या २० विद्यार्थ्यांना त्याच दिवशी कंपनीच्या वतीने ऑफर लेटर प्रदान करण्यात आले.

विद्यार्थ्यांना नामांकित औषधनिर्माण कंपनीत करिअरची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ. बालाजी मुधोळकर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. संजय पेकमवार आणि प्लेसमेंट ड्राईव्हचे समन्वयक डॉ. शशिकांत ढवळे यांनी विशेष पुढाकार घेतला. प्लेसमेंट टीममधील वैशाली शेळके, वर्षा कदम तसेच उपस्थित विद्यार्थ्यांनीही या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे औषधनिर्माणशास्त्र संकुलाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि उद्योगाभिमुख शिक्षण पद्धतीचा पुन्हा एकदा प्रत्यय आला असून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या निवडीमुळे संकुलात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही अशा प्रकारच्या उद्योग-संलग्न उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

# संत सेवालाल महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

बंजारा समाजाचे धर्मगुरू श्री संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त श्री संत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने ढोलताशांच्या गजरात श्री संत सेवालाल महाराजांच्या पुतळ्याची शहराच्या मुख्य रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात आली. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी माईचे मंदिर, कंधार येथून श्री संत सेवालाल महाराजांच्या पुतळ्याची ढोलताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. शहरातील मुख्य रस्ता गांधी चौक ते भगवान बाबा चौक मार्गे ही मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी जय सेवालालच्या जयघोषना आणि पारंपारिक वेशभूषेत बंजारा समाजबांधवांनी बंजारा गीतावर ठेका देत भक्तिमय वातावरणार न्हाऊन निघाले. आपल्या धर्मगुच्या चरणी नतमस्तक होत त्यांचा वारसा आणि शिकवण मनाशी बाळगून अनेकांनी बंजारा गाण्यावर ठेका धरला होता. या मिरवणूकीचे विशेष आकर्षनात भव्य रथ, पारंपरिक वेशभूषा, बंजारा नृत्य, हलगी पथक,बँड पथक हे मुख्य होते. या मिरवणूकीचा समारोप मोढा मैदानावर करण्यात आला. या मिरवणूकीमध्ये डॉ.संजय पवार, देविदासभाऊ राठोड, लोकनियुक्त नगरीचे नगराध्यक्ष शहाजी नळगे,कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष संजय भोसीकर,भाजपचे चंद्रसेन पाटील, डॉ.सुनिल धोंडगे,प्रा. पुरुषोत्तम धोंडगे, उत्तम चव्हाण, सुधाकर अण्णा कांबळे सह शहरातील त्या त्या प्रभागाचे आजी माजी नगरसेवक, जयंती मंडळाचे अध्यक्ष सुनील राठोड यांच्यासह सर्व टीम व बंजारा समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

# अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सामाजिक न्याय विभागामार्फत विविध राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतात. या पुरस्कारासाठी इच्छुक सामाजिक कार्यकर्ते व सेवाभावी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयाकडे 15 मार्च 2026 पर्यंत सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, शाहू-फुले-आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

# समर्थ संकुलामध्ये इलेक्ट्रॉनिक्स म्युझियमचे नवे दालन सुरू

*म्युझियम म्हणजे ज्ञान, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा आविष्कार : खासदार डॉ. अमोल कोल्हे*

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक्स म्युझियम लॅब चे उद्घाटन संसदरत्न खासदार डॉ.अमोल कोल्हे व माजी आमदार अतुल बेनके यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील इतिहास,प्रगती आणि नवकल्पना यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी या उद्देशाने हे म्युझियम उभारण्यात आल्याचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी सांगितले. म्युझियममध्ये इलेक्ट्रॉनिकच्या मूळ संकल्पना, कॅपॅसिटर,रेसिस्टर,ट्रांजिस्टर,किज



यापासून तयार केलेले सर्किट व त्याची,कार्यप्रणाली कशी चालते याचे प्रदर्शन मांडण्यात आलेले होते. इलेक्ट्रॉनिक्स विषयी फारशी माहिती नसणारा देखील हे प्रदर्शन पाहिल्यानंतर इलेक्ट्रॉनिक्स विषयी कुतूहल निर्माण होईल असे हे म्युझियम असल्याचे यावेळी माजी आमदार अतुल बेनके यांनी सांगितले. यावेळी खासदार अमोल कोल्हे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत आधुनिक तंत्रज्ञान,नवकल्पना,संशोधन आणि भविष्यातील करिअरच्या संधी यावर सखोल चर्चा केली. विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार,कल्पना आणि प्रश्न ऐकून त्यांचा उत्साह व जिज्ञासा निश्चितच प्रेरणादायी ठरेल.कार्यक्रमादरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या मेहनतीचे मनापासून कौतुक केले.

“इलेक्ट्रॉनिक्स हे आजच्या काळातील अत्यंत वेगाने विकसित होणारे क्षेत्र आहे.अशा म्युझियममुळे विद्यार्थ्यांना जुन्या ते आधुनिक उपकरणांचा प्रवास समजेल आणि संशोधनाची प्रेरणा मिळेल.”विद्यार्थ्यांनी नवतंत्रज्ञान आत्मसात करून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे,असे आवाहन यावेळी केले. या म्युझियममध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकमुनिकेशन इंजीनियरिंग विभागाचे प्रमुख प्रा.निर्मल कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमार्फत विविध उपकरणे,आधुनिक सर्किट बोर्ड,मायक्रोप्रोसेसर,विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे मॉडेल्स तसेच माहितीफलकांची सुबक आणि आखीव रेखीव मांडणी करण्यात आली आहे.नवीन तंत्रज्ञानाला व्यवहारिकतेची जोड देऊन सहजपणे समजतील अशा संज्ञांचे स्पष्टीकरण फलकाद्वारे त्याचप्रमाणे डेमो आणि मॉडेलच्या च्या माध्यमातून सादर करण्यात आलेले होते.

# 'एन.एम.एम.एस.' परीक्षेत डंका; ८१ विद्यार्थी उत्तीर्ण

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय जामखेड येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या NMMS शिष्यवृत्ती परीक्षा (सन २०२५–२६) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेस विद्यालयातील एकूण ९६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे, रयत शिक्षण संस्थेच्या, श्री नागेश विद्यालय, जामखेड ने 'एन.एम.एम.एस.' (NMMS) परीक्षा सन २०२५-२६ मध्ये ऐतिहासिक यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८४.३८% लागला असून, परीक्षेस बसलेल्या ९६ विद्यार्थ्यांपैकी ८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. नागेश विद्यालयात या परीक्षेत आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे या दोन्ही विद्यार्थ्यांनी १४९ गुण




मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. या यशाने जामखेड तालुक्यात विद्यालयाचे नाव पुन्हा एकदा सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. या परीक्षेत विद्यालयातील १३ विद्यार्थ्यांनी १२० पेक्षा अधिक गुण मिळवून घवघवीत यश मिळवले, तर ३३ विद्यार्थ्यांनी १०० पेक्षा जास्त गुणांचा टप्पा पार केला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांक आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे (दोन्ही १४९ गुण) द्वितीय क्रमांक भोंडवे यश महादेव (१४७ गुण) तृतीय क्रमांक वराट यशराज शहादेव (१४५ गुण) चौथा क्रमांक भवर यशराज शंकर (१४४ गुण) तसेच जाधव ओम, वटाणे ओंकार, माळी कृष्णा, धुमाळ सोहम, पवार अथर्व, तिवारी करण, जगताप अनिश आणि रेळेकर श्रेयश या विद्यार्थ्यांनीही १२० पेक्षा अधिक गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात मार्गदर्शक शिक्षकांचा मोठा वाटा आहे. बुद्धिमत्ता विभागाचे प्रमुख देशमुख एस.एस., विज्ञान विषयाचे मडके बी.के. व पठाण ए.एन., सामाजिक शास्त्राचे लटपटे डी.व्ही. आणि गणित विषयाचे चौधरे ए.बी. यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक मडके बी.के., पर्यवेक्षक जाधवर एस.व्ही., स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य राजेंद्र कोठारी, हरिभाऊ बेलेकर व विनायक राऊत, शाळा व्यवस्थापन समिती आणि सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले आहे. रयत शिक्षण संस्था आणि जामखेड परिसरातून यशस्वी विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# ९ ते १३ मार्च दरम्यान कार्यक्रम

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या संकल्पनेतून 'आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत नांदेड येथे द्वितीय अपीलांचा विशेष अपील निर्गत कार्यक्रम 9 ते 13 मार्च 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर खंडपीठाकडे माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 19 (3) अंतर्गत प्रलंबित द्वितीय अपीलांचा शिघ्र निपटारा व्हावा तसेच अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वेळेची बचत व्हावी, या उद्देशाने नांदेड जिल्ह्याशी संबंधित द्वितीय अपीलांची सुनावणी नांदेड मुख्यालयी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन 2024 व सन 2025 या कालावधीत आयोगाकडे सादर करण्यात आलेली व अद्याप प्रलंबित असलेली नांदेड जिल्ह्यातील एकूण 1136 द्वितीय अपीलांची सुनावणी या विशेष कार्यक्रमांतर्गत मा. राज्य माहिती आयुक्त, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ यांचेसमोर होणार आहे.

# बार्टी 'करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअर' ला हजारो विद्यार्थ्यांची उपस्थिती

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

२८ फेब्रुवारी २०२६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने आज नांदेडमध्ये अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी 'बार्टी करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअर' चे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, राज्यातील विविध जिल्ह्यांसह शेजारील तेलंगणा (पूर्वीचा आंध्र प्रदेश भाग) राज्यातूनही विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उच्च शिक्षणासोबतच जागतिक संधींचे ध्येय यावेळी मार्गदर्शन करताना बार्टीचे महासंचालक सुनील वारे म्हणाले की,"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून परदेशात उच्च शिक्षण घेतले. त्यांचा हा आदर्श आजच्या विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर ठेवायला हवा. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना या मेळाव्याच्या माध्यमातून आखाती देशांमध्ये



रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी बार्टी सर्वतोपरी प्रयत्न करेल." पायलट प्रोजेक्टला उत्स्फूर्त प्रतिसाद नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सुनील वारे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड म्हणाले की, मराठवाड्यातील तरुणांना आखाती राष्ट्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी बार्टीने नांदेडमध्ये हा 'पायलट प्रोजेक्ट' राबवला आहे. या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहता, जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. प्रशासकीय व तांत्रिक सहकार्य निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना विदेशात जाण्यासाठी लागणारी प्रशासकीय कागदपत्रे व इतर मदत जिल्हा प्रशासनाकडून प्राधान्याने दिली जाईल, असे त्यांनी आश्वासित केले. तसेच, प्रेरणा कन्सलटन्सीचे अध्यक्ष प्रकाश बोडके यांनी परदेशातील नोकरीची प्रक्रिया आणि संधी याबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला विविध योजनांचा आढावा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

कै. शंकरराव चव्हाण नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा नुकताच घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, लातूरचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नाना सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीस जिल्ह्यातील सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक तसेच 'मैत्री' व नॅशनल डेअरी स्कीम अंतर्गत कार्यरत सेवादाते उपस्थित होते. नांदेड जिल्ह्यातील पशुप्रजनन कार्य, दुग्ध उत्पादन वाढ तसेच विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प (टप्पा 2) अंतर्गत बाबनिहाय आढावा घेण्यात आला. यासोबतच किसान क्रेडिट कार्ड योजना, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन कायदा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील प्रजननक्षम गाय व म्हैस वर्गीय जनावरांसाठी वंध्यत्व निवारण शिबिरे आयोजित करून कृत्रिम रेतनाचे प्रमाण वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. अधिक दुध उत्पादन देणारी जनावरे तसेच मादी कालवडींची निर्मिती करण्यासाठी लिंगवर्गीकृत रेतमात्राचा वापर वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. दुग्ध उत्पादनवाढीसाठी विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत कृती आराखडा तयार करून प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

# श्री तिलोक जैन विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन विविध उपक्रमांनी साजरा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

२८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येते. त्या अनुशंगाने शहरातील उपक्रमशील विद्यालय म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री तिलोक जैन विद्यालयातील प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन अतिशय उत्साहात संपन्न झाला. या निमित्ताने विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा,वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा,पोस्टर स्पर्धा ,विज्ञान प्रदर्शन,वैज्ञानिक व्याख्यान,अंधश्रद्धा निर्मूलन करण्याच्या दृष्टीने वैज्ञानिक प्रयोग तसेच विज्ञान विषयावर मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात आली.रांगोळी,पोस्टर स्पर्धा व




विज्ञान प्रदर्शन यात विद्यार्थ्यांनी विज्ञानातील मानवी जीवन सुकर करण्याच्या दृष्टीने विविध संकल्पना आकर्षक,शास्त्रीय आणि सर्जनशील पद्धतीने सादर केल्या.डॉ.सी.व्ही.रामण या भारतीय शास्त्रज्ञाचा रामण परिणाम व या शोधास मिळालेले नोबेल पारीतोषिक भारतीयांच्या दृष्टीने किती अभिमानास्पद आहे या बाबत अनेक विद्यार्थ्यांनी प्रभावी मनोगत व्यक्त करत उपस्थितांची मने जिंकली.या वेळी डॉ.सी .व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. या उत्साह वर्धक वैज्ञानिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते रांगोळी स्पर्धा, पोस्टर निर्मिती व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व विषद करत विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती कायम ठेवावी असे प्रतिपादन केले. यावेळी श्री आनंद महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.अजिंक्य भोर्डे व विद्यालयातील उपक्रमशील विज्ञान शिक्षक सुनील कटारिया यांना प्रमुख व्याख्याता म्हणून निमंत्रित करण्यात आले.यावेळी प्राध्यापक डॉ.अजिंक्य भोर्डे यांनी विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधत भविष्यातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील आव्हाने त्यावरील उपाय योजना व उपलब्ध असणाऱ्या संधी याचे विवेचन केले तसेच आयुष्यातील शिस्तीचे महत्व देखील स्पष्ट केले तर विद्यालयातील उपक्रमशील विज्ञान शिक्षक सुनिल कटारिया यांनी “विज्ञान आणि मानवी जीवन” या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी त्यांनी डॉ.सी. व्ही. रामन यांचा संपूर्ण जीवनपट तर उलगडून दाखवलाच पण त्याचबरोबर विज्ञानामुळे मानवी जीवनात झालेल्या प्रगतीची माहिती देत विद्यार्थ्यांना संशोधनवृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. शिवाय विविध शास्त्रज्ञांची उदाहरणे देवून वेगवेगळे शोध कसे लागले याचे विवेचन केले. यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे प्रमुख सेवानिवृत्त प्राचार्य शशिकांत गायकवाड व डॉ .श्रीकांत काळोखे यांनी वेगवेगळे वैज्ञानिक प्रयोग सादर करून समाज अंधश्रद्धेला कसा बळी पडतो व त्यावर काय उपाययोजना केल्या पाहिजेत याचे प्रात्यक्षिकासह विवेचन केले .

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे पदाधिकारी, प्रशासनातील अधिकारी या सह विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश ताठे यांनी केले तर सूत्रसंचालन जयमाला खाटीक यांनी करून आभार मनीषा वंजारी यांनी मानले.